आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.elaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ९ वे ● अंक ५० वा ● रविवार दि. १० ऑगस्ट २०२५ ● किंमत २ रुपया ● पाने ४ ●




## अंबरनाथ सारख्या जागरूक व गतिमान शहरातील नवी न्यायालयीन वास्तू न्याय, समता आणि लोकशाही मूल्यांचे प्रतिबिंब ठरेल !

ठाणे, (जिमाका) : अंबरनाथ सारख्या जागरूक व गतिमान शहरातील ही न्यायालयाची वास्तू न्याय, समता आणि लोकशाही मूल्यांचे प्रतिबिंब ठरेल, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांनी केले.



चिखलोली–अंबरनाथ येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालयाच्या तसेच नूतन न्यायालयीन इमारतीचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीष कुलकर्णी यांच्या हस्ते तर उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.

न्यायमूर्ती श्री.कुलकर्णी म्हणाले की, वाढत्या लोकसंख्येमुळे अंबरनाथसारख्या ठिकाणी हे न्यायालय झाल्यामुळे न्यायदानाचे काम जलदगतीने होणार आहे. चिखलोली–अंबरनाथ येथील ही न्यायालयीन इमारत आधुनिक असून येथे विविध आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. या आधुनिक इमारतीच्या माध्यमातून 'न्याय आपल्या दारी' ही संकल्पना साकार होण्यास मदत होणार आहे.

ते पुढे म्हणाले की, अंबरनाथ सारख्या जागरूक व गतिमान शहरातील ही वास्तू न्याय, समता आणि लोकशाही मूल्यांचे प्रतिबिंब ठरेल, अशी मला अपेक्षा आहे. या उद्घाटनाच्या निमित्ताने आपण न्यायालयाकडे केवळ कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नव्हे तर जनतेच्या विश्र्वासास पात्र ठरणारी एक सजीव संस्था म्हणून पाहू या.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आज उद्घाटन झालेल्या या न्यायालयाची इमारत अतिशय सुंदर व प्रशस्त झाली आहे. अंबरनाथची ओळख असलेल्या पुरातन शिवमंदिराप्रमाणे हे न्यायमंदिर देखील एक ओळख होईल. या न्याय मंदिरात कायम सत्याचाच विजय होईल. राज्याला निष्पक्ष न्यायदानाची परंपरा आहे. आम्ही विविध उद्घाटने करतो मात्र न्यायालयाचे उद्घाटन करणे ही एक आनंदाची आणि समाधानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, आपले शासन लोकांना न्याय देणारे आहे. मागील अडीच वर्षात ३२ न्यायालयांची स्थापना करण्यात आली आहे. न्याय संस्था सुदृढ करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. सामान्य नागरिकांना चांगल्या वातावरणात न्याय मिळेल. त्याचप्रमाणे न्यायव्यवस्थेच्या सर्व गरजा पूर्ण करण्याचे काम शासन करेल जेणेकरून नागरिकांना न्याय मिळण्यास मदत होईल.

यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीराम मोडक, न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे, न्यायमूर्ती अद्वैत सेठना, ठाण्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास अग्रवाल, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाचे अध्यक्ष ड.विठ्ठल कोंडे–देशमुख यांच्यासह ज्येष्ठ विधिज्ञ, स्थानिक लोकप्रतिनिधी, संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने ज्येष्ठ विधीज्ञांचा सत्कार तसेच उल्हासनगर बार असोसिएशनच्या वतीने प्रकाशित स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

## 'देवाभाऊ लाडकी बहीण महिला नागरी सहकारी पतसंस्थे'चे महसूलमंत्री याच्या हस्ते उद्घाटन

बुलढाणा, (जिमाका) : चिखली तालुक्यातील देवाभाऊ लाडकी बहीण महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित पतसंस्थेचे उद्घाटन आज राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कामगार मंत्री आकाश फुंडकर उपस्थित होते.



उद्घाटन कार्यक्रमाच्या वेळी संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष तथा आमदार श्र्वेता महाले, आमदार संजय गायकवाड, माजी आमदार विजयराव शिंदे, माजी आमदार शशिकांत खेडेकर, माजी आमदार तोताराम कायदें तसेच जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, तहसिलदार संतोष काकडे आदी उपस्थित होते.

उद्घाटनानंतर बावनकुळे यांनी संस्थेच्या कार्याची माहिती घेतली. महिलांना आर्थिक सबलीकरणासाठी अशा संस्थांची गरज अधोरेखित केली. महिलांना आर्थिक व्यवहारात सक्षम बनविण्यासाठी पतसंस्था महत्त्वाची भूमिका बजावतात. देवाभाऊ लाडकी बहिण पतसंस्थामुळे स्वयंरोजगार व बचत संस्कृती बळकट करण्यास मदत करेल, असा विश्र्वास व्यक्त केला. या पतसंस्थेच्या राज्यभर शाखा उभारून लाडक्या बहिणींना आर्थिकदृष्ट्या साक्षर व सक्षम करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले, 'शासन गोरगरीब, शेतकरी व सामान्य नागरिकांसाठी काम करत आहे. लाडक्या बहिणींना दरमहा १,५०० रुपये दिले जात आहेत, शेतकऱ्यांना मोफत वीज दिली जात आहे, लवकरच समितीचे सर्व्हेक्षण पूर्ण करून गरजू शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. स्वस्तात शेतजमीन मोजणी, विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे अल्पदरात उपलब्ध करणे, नकाशा योजनेद्वारे प्रॉपर्टी कार्ड, स्वामित्व योजना, पाणंद रस्ता, तुकडेबंदी कायदा रद्द करणे असे ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतले आहेत.'

चिखली तालुक्यातील जिवंत सातबारा मोहिम संपूर्ण राज्यासाठी प्रेरणादायी असल्याने ती राज्यभर राबविण्याचा निर्णय घेतल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

कामगार मंत्री आकाश फुंडकर म्हणाले, चिखली तालुका हा पतसंस्थांचा माहेरघर आहे. देवाभाऊ लाडकी बहीण पतसंस्थेमुळे महिलांना बचत ठेवण्याचे हक्काचे ठिकाण मिळाले आहे. केवळ अल्पावधीत २,५०० बहिणींनी येथे खाते उघडून हे सिद्ध केले आहे. या पतसंस्थेमार्फत महिलांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध होणार असून महिलांनी स्वयंरोजगारासाठी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

आमदार श्र्वेता महाले यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या भावी योजनांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, देवाभाऊ लाडकी बहीण पतसंस्था ही महाराष्ट्रातील पहिली महिलांची नागरी पतसंस्था असून, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा नवा टप्पा ठरेल. या उपक्रमाचा उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांना स्वावलंबी बनवणे आणि लोकसंख्येतील सुमारे ४० टक्के हिस्सा असलेल्या महिलांना उद्योग, व्यवसाय व आर्थिक व्यवहारात प्रोत्साहन देणे हा आहे.

उद्घाटन सोहळ्यासाठी स्थानिक मान्यवर, नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, तसेच विविध महिला बचतगटांच्या प्रतिनिधीं, मोठ्या संख्येने नागरिक, महिला सदस्य आणि स्थानिक रहिवासी उपस्थित होते.

## भोकरच्या 'श्री शाहू' विद्यालयाकडून देशाला अनोखी मानवंदना

भोकर/ प्रतिनीधी/ येथील श्री शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय हे सातत्याने आपल्या आगळ्यावेगळ्या नवोपक्रमांसाठी सुप्रसिद्ध आहे. यंदाच्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून 'शाहू परिवाराकडून' भोकरकरांना राष्ट्रभक्तीची एक अनोखी मेजवानी अनुभवायला मिळणार आहे. यासाठी शाहू परिवार सज्ज असून शाहूचे सुमारे तीन हजार विद्यार्थी या तिरंगा रॅलीत सहभागी होणार आहेत.



यंदाच्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे १४ ऑगस्टल रोजी सकाळी १०:३० वाजता ही तिरंगा रॅली शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून निघून भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या नियोजित जागी वंदन करून मूख्य रस्त्याने पुन्हा परत जाईल. श्री लाल बहादूर शास्त्री शिक्षण संस्थेचे सचिव शिरिष भाऊ देशमुख गोरठेकर यांच्या हस्ते तिरंगा रॅलीला हिरवी झेंडी दाखवून सुरुवात होईल. विशेष आकर्षण म्हणजे या रॅलीसाठी सुमारे एक हजार मिटर लांबीचा राष्ट्रध्वज तयार केला जात आहे. देशातील आजपर्यंतच्या इतिहासातील हा सर्वाधिक दुसऱ्या क्रमांकाच्या लांबीचा राष्ट्रध्वज असणार आहे. यापूर्वी सुमारे साडेतीन किलोमीटर लांबीचा राष्ट्रध्वज एका रॅलीत वापरला गेला. 'शाहू परिवाराकडून' तयार केला जाणारा 'तिरंगा' एक हजार मिटर लांबीचा असेल. केवळ 'शाहू परिवारा'मुळेच देशप्रेमाने ओथंबलेला हा क्षण आणि सोहळा अनुभवण्याची सुवर्णसंधी भोकरकरांना लाभणार आहे, असे सर्वत्र बोलले जात असुन देशातील आजपर्यंतच्या इतिहासातील हा सर्वाधिक दुसऱ्या क्रमांकाच्या लांबीचा राष्ट्रध्वज शाहू परिवाराने तयार केला असल्याने हा नेत्रदीपक क्षण पाहण्यासाठी विद्यार्थी तसेच भोकरकरांमधे उत्सुकता लागली आहे.

## उत्तरकाशी भूस्खलन, पूरस्थिती; महाराष्ट्रातील पर्यटक सुरक्षित, बहुतांश पर्यटक आज राज्यात परतणार - आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन

मुंबई, : उत्तराखंडच्या उत्तरकाशी



जिल्ह्यातील धराली आणि हर्षिल परिसरात मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या भूस्खलन व पुरस्थितीत अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे. या पर्यटकांना जॉली ग्रँड विमानतळ आणि मताली कॅम्प येथे आणण्यात आले असून ते सुखरूप आहेत. उर्वरित एक पर्यटक श्रीमती कृतिका जैन यांचा शोध अद्याप सुरू असून त्यासाठी संबंधित यंत्रणा कार्यरत आहेत. यामधील बहुतांश पर्यटक आज महाराष्ट्रात परतणार असून, काही पर्यटक त्यांच्या पुढील यात्रांसाठी रवाना झाले असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाराज हे उत्तराखंडच्या उत्तरकाशी जिल्ह्यात धराली येथे घडलेल्या घटनेनंतर तातडीने राज्यातील पर्यटकांच्या मदत व बचाव कार्यासाठी दाखल झाले. राज्य शासनाने या घटनेदरम्यान विशेष नियंत्रण कक्ष सुरू करून नातेवाईकांकडून माहिती घेऊन या ठिकाणच्या राज्यातील पर्यटक नागरिकांना आवश्यक मदत पोहचवून ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यास प्राधान्य दिल्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री श्री. महाजन यांनी सांगितले.

मंत्री श्री. महाजन यांनी सांगितले, उत्तरकाशीतील भूस्खलन, पूरस्थिती घटनेत राज्यातील सर्व पर्यटक सुखरूप आहेत, याचा आनंद आहे. राज्यातील लोक अडचणीत असतील, तर त्यांची सुरक्षितता ही आपली जबाबदारी आहे. त्यानुसार उत्तराखंड सरकार, स्थानिक पोलीस, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांनी राज्यातील एकत्रितपणे कार्य करून पर्यटकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले.

मंत्री श्री. महाजन यांनी सांगितले, जे पर्यटक राज्यात परतणार आहेत त्यांची राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या समन्वयातून परतीची व्यवस्था करण्यात येत आहे. यामुळे उत्तरकाशी येथे अडकलेल्या पर्यटक नागरिकांच्या कुटुंबियांना मोठा दिलासा मिळाला असल्याचेही श्री. महाजन यांनी सांगितले.

## मनपा आयुक्तांची रक्षाबंधन निमित शहरवासीयांना भेट मालमत्ता कर १०० % व्याज/शास्ती माफी

लातूर /प्रतिनिधी : कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने वर्षाच्या सुरूवातीपासूनच मालमत्ताधारकासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार वेळोवेळी विविध प्रकारचे सुट योजना ही लागू करण्यात आली होती. सदरील सुटचा लाभ घेऊन आतापर्यंत १७ हजार हून अधिक मालमत्ताधारकांनी आपला कर भरणा केला आहे. परंतु अद्याप ही काही थकबाकीदार यांनी कर भरणा केलेला नाही. थकबाकीधारक नागरिकांसाठी मनपा सुवर्णसंधी घेऊन आले आहे .तेव्हा सर्व मालमत्ता धारकाना कळविण्यात येते की, रक्षाबंधन व स्वातंत्र दिनानिमित्त लागू केलेल्या फेस्टिवल ऑफर अंतर्गत दिं.९ ते १७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत आपल्याकडील थकीत कर एक रक्कमी भरल्यास आकारण्यात आलेल्या व्याज/शास्ती मध्ये १०० टक्के सूट देण्यात आली आहे.

तरी या योजनेचा सर्व मालमत्ताधारकांनी लाभ घेवुन आपल्याकडील देय कराचा भरणा करून महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी केले आहे.

## भारत निवडणूक आयोगाकडून ३३४ पक्षांची नोंदणी रद्द

मुंबई, दि.९ : भारत निवडणूक आयोगाने (ECI) निवडणूक व्यवस्था पारदर्शक करण्याच्या मोहिमेअंतर्गत कारवाई करत ३३४ नोंदणीकृत परंतु मान्यता नसलेल्या राजकीय पक्षांची (RUPPs) नोंदणी रद्द केली आहे.




सध्या देशात ६ राष्ट्रीय पक्ष, ६७ प्रादेशिक पक्ष आणि २८५४ नोंदणीकृत पण मान्यता नसलेले राजकीय पक्ष (RUPPs) आहेत. लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ च्या कलम २९अ अंतर्गत नोंदणी करताना पक्षांनी नाव, पत्ता, पदाधिकारी यांची माहिती द्यावी लागते तसेच सहा वर्षे सलग निवडणूक न लढवल्यास नोंदणी रद्द करण्याचा अधिकार आयोगाकडे आहे.

जून २०२५ मध्ये आयोगाने राज्य व केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना ३४५ ठ्णझझी ची पडताळणी करण्याचे निर्देश दिले होते. तपासणीदरम्यान संबंधित पक्षांना नोटिसा देऊन प्रत्यक्ष सुनावणीची संधी देण्यात आली.

मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार, ३३४ पक्षांनी आवश्यक अटींचे पालन केले नाही. उर्वरित प्रकरणे पुनर्पडताळणीसाठी परत पाठवण्यात आली आहेत. परिणामी, आता देशातील RUPPsची संख्या २८५४ वरून २५२० वर आली आहे.

या पक्षांना आता लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ मधील कलम २९ब आणि २९क तसेच आयकर कायदा, १९६१ व निवडणूक चिन्ह आदेश, १९६८ अंतर्गत कोणताही लाभ मिळणार नाही. तसेच या पक्षांना आयोगाच्या आदेशाविरोधात ३० दिवसांच्या आत अपील करता येईल.

भारत निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रातील (१) अवामी विकास पार्टी, (२) बहुजन रयत पार्टी, (३) भारतीय संग्राम परिषद, (४) इंडियन मिलन पार्टी ऑफ इंडिया, (५) नव भारत डेमोक्रॅटिक पार्टी, (६) नवबहुजन समाज परिवर्तन पार्टी, (७) पिपल्स गार्डियन, (८) दि लोक पार्टी ऑफ इंडिया आणि (९) युवा शक्ती संघटना या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाची नोंदणी रद्द करण्यात आली आहे.

तपशीलवार यादीसाठी https://www.eci.gov.in/list-of-political-parties या आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आयोगाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## महाराष्ट्रातील कारागृह ग्रंथालयांसाठी राजा राममोहन रॉय ग्रथालय प्रतिष्ठान कोलकाता याच्याकडून बुककेस आणि बुकरॅक देण्याचा निर्णय

मुंबई, : कारागृहातील बांधवांचे सामाजिक, शैक्षणिक हित लक्षात घेऊन त्यांच्यात सुधारणा व पुनर्वसन होण्याच्यादृष्टीने राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या समान निधी योजनेंतर्गत ग्रंथालय संचालनालयाच्या राज्यातील ६० कारागृह ग्रंथालयांसाठी प्रत्येकी एक बुककेस आणि एक बुकरॅक देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कारागृहातील बांधवांना वाचनाची आवड निर्माण होऊन त्यांना वाचनासाठी संधी मिळावी, त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक व्हावा याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात पाठपुरावा करण्याचे निर्देश दिले होते.




राज्यातील प्रत्येक कारागृहातील बांधवांना वाचनाची संधी उपलब्ध होऊन वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी, त्यातून त्याचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदल होण्याकरिता, या बांधवांचे सामाजिक हित लक्षात घेऊन त्यांच्यात चांगल्या सुधारणा होण्याच्या दृष्टीने ग्रंथालय संचालनालयाच्या सहकार्याने बुककेस आणि बुकरॅक मिळावे, असे कळविण्यात आले होते.

राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या विविध योजनांचा लाभ राज्यातील ग्रंथालयांना कसा घेता येईल यासाठी राज्य ग्रंथालय नियोजन समितीच्या दिनांक १३ डिसेंबर, २०२४ रोजीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानला विनंती करून राज्य शासनाकडून त्याचा पाठपुरावा करण्यात आला. त्यानुसार राज्यातील ६० कारागृह ग्रंथालयांना प्रत्येकी बुककेस आणि बुकरॅक मंजूर करण्यात आले असून लवकरच कारागृह ग्रंथालयास पुरवण्यात येणार आहे.

या सामाजिक उपक्रमामुळे ग्रंथालये केवळ पुस्तके ठेवण्याची जागा न राहता, ज्ञानप्रद आणि आकर्षक वाचन केंद्र म्हणून विकसित होतील. राज्यातील वाचनसंस्कृती वृद्धिंगत होईल यासाठी इतर ग्रंथालयांनीही अशा सामाजिक योजनांचा लाभ घेण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन राज्य शासनाकडून करण्यात आले आहे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.elaturprabhat.in

# ऑगस्ट क्रांती दिन.

९ ऑगस्ट हा दिवस संपूर्ण देशात ऑगस्ट क्रांती दिन म्हणून साजरा करण्यात आला. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करण्यासाठी ज्यांनी प्राणाची आहुती दिली त्या हुतात्म्यांचा स्मरण करण्याचा दिवस म्हणजे ९ ऑगस्ट अर्थात क्रांती दिन ! स्वातंत्र्यलढ्याची मशाल पेटवत देशातून इंग्रज राजवटीला नेस्तनाबूत करण्याची हाक देणाऱ्या तमाम ज्ञात अज्ञात क्रांतिवीरांना अभिवादन करण्याचा हा दिवस. इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य करण्याचा दिलेला शब्द न पाळल्यामुळे या आंदोलनाची सुरुवात झाली. ८ ऑगस्ट १९४२ रोजी भारताला स्वातंत्र्य देणार असल्याची घोषणा इंग्रज सरकारने केली होती मात्र ऐनवेळी भारताला स्वातंत्र्य देणार नसल्याचे इंग्रजांनी सांगितले. त्यामुळे महात्मा गांधींनी देशभर ऑगस्ट क्रांती आंदोलनाची घोषणा केली. या आंदोलनाला चले जाओ आंदोलन असेही नाव देण्यात आले. करो या मरो अशी घोषणा या आंदोलनात करण्यात आली. दीडशे वर्षे भारतावर राज्य करणाऱ्या इंग्रजांना देशातून हुसकावून लावण्यासाठी ९ ऑगस्ट १९४२ रोजी क्रांतीची ठिणगी पडली होती. ९ ऑगस्ट रोजी महात्मा गांधींसह अनेक ज्येष्ठ नेत्यांना इंग्रजांनी अटक केली होती त्यामुळे संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट पसरली होती. महात्मा गांधींच्या झालेल्या अटकेला विरोध करण्यासाठी संपूर्ण देश एकवटला होता. इंग्रजांनी नेत्यांची धरपकड केल्याने आंदोलन लोकांच्या ताब्यात गेले. देशभर जागोजागी हरताळ, मिरवणुका, मोर्चे यांना ऊत आला. सरकारने लोकांना एकत्र येण्यास बंदी घातली पण लोक सरकारचे आदेश मानायला तयार नव्हते. आंदोलक पोलिसांच्या लाठीहल्ल्याला, गोळीबाराला जुमानत नव्हते. जाळपोळ, पोलिसांचे खून, टेलिफोन व तारा कापणे असे प्रकार सुरू झाले.

जणू लोकांनी ब्रिटिश सत्तेविरूद्ध युद्ध पुकारले होते. संपूर्ण देश पेटला होता. दंगल, जाळपोळ, गोळीबार, रेल्वेचे अपघात, सरकारी कार्यालयांना आगी लावणे, सरकारी खजिन्यांची लुटालूट असे प्रकार सुरू होते. इंग्रजांच्या दडपशाही विरुद्ध संपूर्ण देश एकवटला होता. देशवसियांच्या एकजुटीने इंग्रजांना गुडघे टेकायला लावले होते. दुसऱ्या महायुद्धाने खिळखिळ्या झालेल्या ब्रिटिश सरकारची या आंदोलनामुळे उरली सुरली ताकदही लोप पावत चालली होती. त्यानंतर देशवासीयांनी इंग्रजांना भारतातून हाकलून लावे पर्यंत हे आंदोलन सुरूच ठेवले. भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य मिळाल्यापासून या आंदोलनात बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना श्रद्धांजली म्हणून हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन म्हणून साजरा केला जातो. मुंबईतील ज्या मैदानावर तिरंगा फडकावून या आंदोलनाची सुरुवत करण्यात आली त्या मैदानाला क्रांती मैदान असे नाव देण्यात आले आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात १८५७ नंतरचा हा सर्वात मोठा स्वातंत्र्य लढा होता म्हणूनच या लढ्याला भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात खूप महत्वाचे स्थान आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# सक्त वूसली संचालनालयाची भामटेगिरी ?

## संपादकीय...

ईडी अर्थात सक्त वसूली संचालनालयाची कार्यपध्दती, आर्थीक गैरव्यवहार, भ्रष्टाचार, फसवणूक वगैरे प्रकरणात ईडीला स्वायतत्ता, स्वतंत्र अधिकार आहेत पण ते सक्तपणे कारवाई करुन त्याची शहानिशा करुन संबंधीताना अटक करणे, दोषारोप सिध्द झाल्यास शिक्षा पात्राना योग्य ती शिक्षा, कारावास या संबंधात शिफारस करणे वगैरे अधिकार असतील, नसतील याचा विचार न करता ईडी ला घाबरून भल्या, भल्याची धादल उडत असते तेच धांदलबाजी कृती ईडीने अर्थात सक्तवसूली संचालनालयाने केल्याचे उघड झाल्याने सर्वोच्च न्यायालयाने ईडीलाच अशी ही भामटेगिरी सोडून कायद्याच्या चौकटीत राहूनच काम करावे असा सल्ला दिल्याने ईडी, सक्त वसूली संचालनालयाची असली, नसली इभ्रत, धाक संपूष्टात येवून ती गटारगंगेत वाहून गेली असल्याचीच प्रतिक्रिया गृहखात्यातून उमटताना दिसते आहे.

आर्थीक गैरव्यवहार प्रकरणात ईडीला संबंधीताना अटक करण्याचे अधिकार असल्याचे एका निकालातून स्पष्ट झाल्याने न्यायालयाचे सुर्यकांत, उज्वल भुयान, एन, कोटेकर सिंह यांचा खंडपिठाने ईडीच्या प्रतिमेबाबत, विश्वासाबद्दल चिंता व्यक्त करुन सक्तवसूली संचालनालयानपे कोणाचीही भामटेगिरी न करता कायद्याच्या चौकटीत राहूनच काम करा असा सज्जड सल्ला दिल्याने ईडीची बेडी अस्ताव्यस्त होते की काय अशीच कुजबूज राजकीय वर्तूळातसह गृहखात्यात ही होताना दिसते आहे.

केंद्र सरकारने अर्थात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी भारताचा, भारतातील राज्य, राज्याचा कारभार पारदर्शक, न्यायीक, स्वच्छ असावा या हेतूने ईडीला अधिकार दिले खरे परंतू अब्जावधीला चूना लावून गेलेल्याना सोडून केवळ विरोधी पक्षाशी संबंधीत व्यापारी, राजकीय नेते, अधिकारी यांच्यावर ईडीची बेडी हाती घेतली आणी ईडी सैरभैर विरोधकावर फास आवळतच गेली आणी अखेर सवोच्च न्यायालयाने न्यायूर्ती भुयान यानी सत्तेचा सत्ताधाऱ्याचा नाद सोडून सरकारी आदेशान्वये नव्हे तर कायद्याच्या चौकटीत राहूनच काम करा असा सज्जड इशारा दिल्याने ईडीसह सरकारी यंत्रणेचा, सत्ताधारी वर्चस्वाचा पर्दाफास झाल्याची कुजबूज सर्वसामान्यातून होताना दिसते आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ईडीला फटकारताना गेल्या पाच वर्षात पाच हजार तक्रारी, गून्हे ईडीने दाखल केली त्यात केवळ पाच हजारातून दहा टक्केच दोषसिध्द झाले बाकीच्याचे काय? अशातून काय सिध्द होते त्यासाठी सत्ता, सरकार यापेक्षा कायदा, न्याय संस्था हीच न्यायीक स्त्रोत असल्याने कोणाची भामटेगिरी न करता कायद्याच्या चौकटीत राहूनच ईडीने काम करावे असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाच्या भुयान खंडपिठाने दिल्याने कळत न कळत केंद्र सरकार आणी प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यानाच ती तशी, अशी चपराक ठरावी असेच कायदे तज्ञात बोलबाला होताना दिसतो आहे ही बाब टाळता येण्यासारखी नसावी असे वाटते.

एकंदरीत गेल्या अकरा वर्षात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी शासकीय,प्रशासकीय यंत्रणा, पोलीस यंत्रणेसह ईडी, सीबीआय, एआय अशा विविध शासकीय यंत्रणाना हाताशी धरुन विरोधी पक्ष नेत्याना, विरोधी अधिकाऱ्याना ईडी, सिबीआय वगैरेच्या माध्यमातून अडकावून एकहाती, स्वार्थी सत्ता भोगण्याचा चंग बाधला तोच तपासातून न्यायकक्षेतून उघड होत असून ईडीचा तर सर्वोच्च न्यायालयाने भुगाच केला यातून केंद्र सरकार, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, ईडी वगैरे संस्था भानावर येवून सक्तवूसली संचालनालयाची, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भामटेगिरी थाबणार की ती प्रबळ होणार हे काळच ठरविणार असल्याने प्रसारमाध्यमाचे डोळे कोणाकडे वळतील हा प्रश्न अनूत्तरीतच राहातो.

# पहिल्या स्मार्ट इंटेलिजंट सातनवरी या गावातील डिजिटल उपक्रमामध्ये ग्रामस्थानांचा सहभाग आवश्यक - विजयलक्ष्मी बिदरी



नागपूर, : देशातील सर्वात स्मार्ट इंटेलिजंट गाव म्हणून निवड झालेल्या सातनवरी या गावामध्ये व्हॉईस ऑफ इंडिया कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी या संस्थेच्या माध्यमातून विविध डिजिटल उपक्रमांना सुरूवात झाली आहे. डिजिटल बेस विविध सुविधांचा प्रत्यक्ष लाभ गावाच्या सर्वांगिण विकासासाठी होणार असल्यामूळे ग्रामस्थांनी या उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन, विभागीय आयुक्त श्रीमती बिदरी यांनी केले.

विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी स्मार्ट इंटेलिजंट गाव म्हणून निवड झालेल्या सातनवरी या गावाला भेट दिली. तसेच व्हाईस संस्थेशी निगडीत विविध पंधरा कंपन्यांनी सुरू केलेल्या कामांची पाहणी केली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकरी विनायक महामुनी, इंटेलिजंट गाव या संकल्पनेचे विशेष कार्यधिकारी रमेश भटनागर, सातनवरी गावाचे सरपंच श्रीमती वैशाली विजय चौधरी, उपसरपंच अनिल रामभाऊ गोतमारे, उपविभागीय अधिकारी श्रीमती वंदना सरंगपते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कपील कलोडे आदी उपस्थित होते.

देशातील स्मार्ट इंटेलिजंट गाव तयार करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या सूचनेनुसार ऑप्टीकल फायबर कनेक्टिविटी असलेल्या सातनवरी या गावाची निवड करण्यात आली आहे. इंटरनेट व वायफाय सुविधेच्या माध्यमातून मेक इन इंडिया अंतर्गच्या विविध पंधरा कंपन्या या गावात सुविधा निर्माण करणार आहे. पायलट प्रोजेक्ट म्हणून राबविण्यात येत असलेल्या विविध प्रकल्पामूळे कृषी, आरोग्य, शिक्षण तसेच जनतेच्या सुविधेसाठी ग्रामस्तरावरील योजनांचा लाभ घेणे सुलभ होणार आहे. ग्रामस्थांना अंमलबजावणी संदर्भात प्रशिक्षण देण्याची संस्थांची जबाबदारी महत्वाची असल्याचे, विभागीय आयुक्त श्रीमती बिदरी यांनी यावेळी सांगितले.

मोबाईल कनेक्टिविटीच्या माध्यमातून विविध डिजिटल उपक्रम येथे राबविण्यात येणार आहे. सातनवरी हे गाव आता जगाशी जोडल्या जाणार आहे. या गावाला डिजिटल सुविधा पुरविण्यासाठी सुरू असलेल्या उपक्रमामध्ये शेतीला प्राधान्य दिले आहे. शेतामध्ये बसविण्यात आलेल्या सेन्सरमुळे शेतातील पेरणीपासून कापणीपर्यंत तसेच बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा, माहिती, पीक पद्धतीचे नियोजन आदी सर्व माहिती डॅशबोर्डवर उपलब्ध झाली आहे. या माहितीमूळे शेतकऱ्याला पीक पद्धतीचे नियोजन सुलभ झाले आहे. या पद्धतीची प्रत्यक्ष पाहणी विभागीय आयुक्तांनी यावेळी केली.

इंटेलिजंट गाव या उपक्रमांतर्गत या गावात ई-स्कील सेंटर, मोबाईल हेल्थ कनेक्टिविटी, हेल्थ कार्ड आणि टेलिमेडिसीन सुविधा उपलब्ध झाली आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील तज्ञ डॉक्टर या उपक्रमामध्ये सहभागी होवून ग्रामस्थांना आरोग्य सुविधांचा लाभ देणार आहे. शाळा व अंगणवाडीमध्ये स्मार्ट ईसीसीई व्हिडियो मार्गदर्शन पुस्तक, ए.आय. च्या माध्यमातून रिमोट क्लास रूम तसेच डिजिटल अंगणवाडी केंद्र ही सुविधा उपलब्ध होत आहेत. संगणकामूळे ग्रामपंचयातमधील सर्व कामे जलद गतीने पूर्ण होतील. तसेच ग्रामस्थांना वायफायच्या माध्यमातून गाव व शहराशी जोडणे सुलभ होणार आहे. गावातील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, तलावांमधील मत्स्यपालनासाठी आवश्यक असलेल्या पाण्यातील घटकांची माहिती डॅशबोर्डवर दिसणार आहे. यासंपूर्ण उपक्रमाचा लाभ ग्रामस्थांसाठी असल्यामूळे प्रत्येक उपक्रमाची माहिती सर्व नागरिकांना देण्यासाठी प्रशिक्षण आयोजित करावे, अशा सूचना श्रीमती बिदरी यांनी दिल्या.

**मुख्यमंत्री भेट देवून पाहणी करणार**

सातनवरी या गावाला देशातील सर्वात स्मार्ट इंटेलिजंट गावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भेट देवून येथील स्मार्ट डिजिटल उपक्रमाची पाहणी करणार आहे. या उपक्रमाची उपयुक्तता व झालेला प्रत्यक्ष बदल यासंदर्भात लाभार्थ्यांशी थेट संवाद साधणार आहे.

प्रारंभी सातनवरी या गावाच्या सरपंच श्रीमती वैशाली चौधरी यांनी स्वागत केले. यावेळी ग्रामपंचायत कार्यालयात व्हाईस संस्थेशी निगडीत विविध दूरसंचार क्षेत्रातील कंपन्यांनी इंटेलिजंट गावात सुरू करण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची तसेच प्रत्यक्ष अंमलबजावणी संदर्भातील माहिती यावेळी सादर केली. या उपक्रमामूळे गावाच्या ग्रामीण विकासाला तसेच नागरिकांच्या जीवनपद्धतीत होणाऱ्या बदलाबद्दलही यावेळी चर्चा करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी प्रशिक्षण सत्राचे आयोजन करावे तसेच या सुविधांचा लाभ निरंतर घेण्यासाठी कार्यपद्धती निश्र्चित करावी, अशी सूचना केली. यावेळी या प्रकल्पाचे प्रमुख व केंद्र शासनाचे विशेष कार्यअधिकरी रमेश भटनागर यांनी या प्रकल्पाची अंमलबजावणी, विविध कंपन्यांचा सहभाग त्यांची कार्यपद्धती व प्रत्यक्ष होणारा लाभ आदी संदर्भात यावेळी माहिती दिली. यावेळी तहसिलदार कल्याण कुमार डहाट, गट विकास अधिकारी सचिन सुर्यवंशी तसेच विविध यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# झरोका

एक - स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका संदर्भात इंडिया महाविकास आघाडीच्या बैठकीसाठी ठाकरे सेनेचे उध्दव ठाकरे हे दिल्ली येथे आले असताना बैठकीपूर्वीच उध्दव ठाकरे यानी शिवसेना आणी मनसे यूती संदर्भात कॉग्रसने हस्तक्षेप करु नये असे विधान केलयाने महाविकास आघाडीचे हे काय चालले आहे तेच कळत नाही, डोकं बधीर झालंय.

दुसरा - अरे, स्वार्थ आणी सत्तेपूढे आघाडी, यूती वगैरे बाबत कांहीही देणे घेणे नसते. कसली इंडिया आघाडी अन् महाविकास आघाडी ही सारी नौटंकीच म्हणावे लागेल म्हणूनच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे विरोधकाना जूमानत नाहीत. पण लक्ष्यात कोण घेतोय.

एक - अहो, पण आरएसएस, भाजपाने लोकशाही, संविधानाची पूर्ती वाट लावण्याचा चंग बांधला आहे, त्यात स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका महत्वाच्या आहेत. यातच लोकशाही संविधान टीकून असताना शिवसेनेच्या ठाकरे यानी कॉग्रेसवर टीका करायला नको होते म्हणून बोलतो आहे.

दुसरा - अरे, लोकशाही, संविधानाचे कोणाला पडले आहे, केवळ सत्तेसाठी सारा हा आटापिटा असतो. सेना, मनसेला मुंबई महानगरपालीका महत्वाची आहे. ग्रामीणभाग महत्वाचा नाही तो कॉग्रेसला हवा आहे हाच यातील फरक आहे, तू शांत बस.

एक - अहो, स्थानिक स्वराज्य संस्था हाच लोकशाहीचा कणा आहे. विधानसभा, लोकसभेचे मूळ बळ आहे, असे असताना शहरी सत्तेवर लक्ष देणे उचित वाटत नाही म्हणून बोलतो आहे.

दुसरा - अरे, स्थानीक स्वराज्य संस्थेचे महत्व प्रथमतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यानी विशद केले त्यानंतर पंजाबराव देशमूख, यशवंतराव चव्हाण, कन्नमवार आणी नंतरच्या काळात शरद पवार, विलासराव देशमूख, गोपीनाथराव मुंडे यानी अधोरेखीत केले होते पण आजघडीला सत्तेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अन् देवेंद्र फडणवीस बसल्याने हे ठाकरे दुसरे काय बोलणार आहेत. ओळखून घ्यायचे असते.

# काय बोलता राव ?

मताची, मतदानाची चोरी झाली किंवा नाही ते शेवटी न्यायालय ठरविणारच झाले. केंद्र सरकार आणी निवडणूक आयोग यात दोषी असावेत असे कॉग्रेससह सर्व विरोधी पक्षाचे मत आहे तसा दावाही विरोधकानी केला आहे त्यात परवा कांही पूराव्यासह कॉग्रेस नेते लोकसभेतील विरोधीपक्षनेते खा. राहूल गांधी यानी लोकसभेत केंद्र सरकार व निवडणूक आयोगावर शंकास्पद ताशेरे ओढले त्यावर चर्चा ही होत आहे, परंतू महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चक्क खा. राहूल गांधी यांच्या डोक्यातील चीप चोरीला गेल्याचा खळबळजनक दावा केला.

**काय बोलता राव !**

अरे, लोकसभेत मागील निवडणूकीत बिहार, महाराष्ट्रात मतदाराची संख्या वाढली, मते चोरली गेली, वगैरे पूराव्यानिशी तसा अहवाल लोकसभेत मांडला परंतू महाराष्ट्रासंदर्भातही खा. राहूल गांधी यानी आक्षेप घेतल्याने महाराष्ट्रातील वाचाळविर मंत्री, आमदाराच्या रांगेत बसून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यानी खा. राहूल गांधी यांचे संतूलन बिघडले आहे काय असा मार्मीक सवाल करण्याऐवजी चक्क राहूल गांधी यांच्या डोक्यातील चीप चोरी गेल्याचे वाचाळ, वात्रट विधान केले परंतू मुख्यमंत्री देवेंद्र, फडणवीस हेच गृहमंत्री असल्याने राहूल गांधी यांचा चीप चोर कोण आहे त्याचा तपास लावून त्यास शिक्षा देतील एवढेच पूरेसे आहे, मग बोला दाजीबा !




# शेतकऱ्यांचे हित आणि एपीएमसी आधुनिकीकरणासाठी केंद्र-राज्य मंत्र्यांची उच्चस्तरीय बैठक घ्यावी



नवी दिल्ली, - शेती उत्पादन व्यवस्थापन, शेतकऱ्यांना योग्य मोबदला, साठवणूक सुविधांचे आधुनिकीकरण आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या (एपीएमसी) पायाभूत सुविधा विकासासाठी केंद्र-राज्य मंत्र्यांची उच्चस्तरीय बैठक तातडीने बोलावण्याची मागणी महाराष्ट्राचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याकडे केली.

तसेच शेतकऱ्यांचे आर्थिक हित आणि कृषी कार्यक्षमता वाढवण्यासाठी ठोस उपाययोजना सुचवत मंत्री श्री. रावल यांनी केंद्रीय योजना तयार करण्याची विनंतीही केंद्रीय कृषी मंत्र्यांच्या शुक्रवारी झालेल्या दिल्ली येथील भेटीदरम्यान केली.

मंत्री जयकुमार रावल यांनी यावेळी नमूद केले की, महाराष्ट्रासह देशभरात कांदा, डाळी, संत्री, डाळिंब, केळी आणि फुले यांसारख्या शेती उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे. मात्र, अपुऱ्या बाजार यंत्रणा आणि वैज्ञानिक साठवणूक सुविधांच्या अभावामुळे शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळत नाही. शेतमाल काढणी पश्र्चात अपुऱ्या साधनांमुळे काही प्रमाणात नुकसान होते. याचा शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर आणि देशाच्या कृषी कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होतो.

श्री. रावल यांनी शेतमालाला योग्य दर मिळवून देण्यासाठी विशेष समर्थन योजना, विकेंद्रित वैज्ञानिक साठवणूक सुविधा, कोल्ड चैन, डिजिटल सूची व्यवस्थापन आणि कार्यक्षम रसद प्रणाली विकसित करण्याचा प्रस्ताव मांडला. बाजार माहिती प्रणालीच्या एकत्रीकरणाद्वारे उत्पादन आणि किंमतीच्या ट्रेंडचा अचूक अंदाज घेऊन शेतकऱ्यांना वेळेवर माहिती पुरवण्यावरही त्यांनी भर दिला. यामुळे धोरणकर्त्यांना माहितीवर आधारित निर्णय घेता येतील.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आधुनिकीकरणासाठी मंत्री श्री. रावल यांनी केंद्रीय योजना तयार करण्याची मागणी केली, ज्यामध्ये झाकलेली लिलाव व्यासपीठे, ग्रेडिंग-तोलन व्यवस्था, थंड साठवण, कोरडे कोठार, पॅकेजिंग केंद्रे आणि कचरा व्यवस्थापन सुविधांचा समावेश आहे. एपीएमसी परिसरातील न वापरलेल्या जागेत लहान ॲग्रो-प्रोसेसिंग युनिट्स, शेतकरी-केंद्रित सुविधा उभारण्यासाठी प्रोत्साहन आणि तांत्रिक सहाय्य देण्याची विनंतीही त्यांनी केली. तसेच, ई-नाम सारख्या डिजिटल व्यासपीठांशी एपीएमसीला जोडण्यासाठी अनुदान आणि क्षमता बांधणीवर भर देण्यात यावा असे सांगितले.

या बैठकीतून ठोस रोडमॅप तयार करून शेतकऱ्यांचे हित जोपासले जाऊ शकते, असे श्री. रावल यांनी सांगितले. अशा उपायांमुळे शेती व्यवसाय टिकाऊ होईल आणि भारताची आंतरराष्ट्रीय शेती बाजारातील नेतृत्व भूमिका अधिक मजबूत होईल, असा विश्र्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**तोबा गर्दी --**

सणवारात अचानक
नेतोबांची तोबा गर्दी
थोडेफार जरीहीखरे
सहेतुक आली अर्धी

दारा पाशी इलेक्शन
मतदात्यां लावे नादी
सर्व पक्षीय जमलेले
भलीमोठी असेयादी

उत्सावा शिरेउत्साही
प्रत्येकाला प्रिय गादी
कधीसंपूर्ण लपाछपी
कधी स्पष्ट साळसुधी

जात धर्म नाही सिमा
असेसकला आझादी
फाटूनिनिघतो बुरखा
उघड होते सत्य कधी

हव्यासाची सवय जडे
लपवणारं कशीव्याधी
स्वच्छ  राज कारणार्थ
कुठूनशोधावी औषधी

उत्सवात मिसळापण
असोअंतर्मनात शुध्दी
पावित्र्य पाळी सणाचे
राज्यकर्ते जर मुत्सद्दी

**नेमणूक --**

वाचाळ  नेतोबांची
खास करे नेमणूक
शुष्क राज कारणा
अंमळशीकरमणूक

बोलतात काही पण
ऐन वेळी अडवणूक
अति करे पार माती
कमीअधिकदमणूक

जल्लोष जोरजोरात
शब्दांतून मिरवणूक
बोटे ठेवी वर्मावरती
स्पष्टवक्तव्यश्रवणूक

समस्या येता कठीण
तेंव्हा दाखवी चुणूक
वळण वेगळे विषया
करी हेचि सोडवणूक

बडे नेते बोलू न शके
तेंव्हा यांची अळणूक
वेळ मिळा विचारार्थ
सुरू होते खेळवणूक

कधी कधी उद्दिष्टावर
निशाणा साधे अचूक
लक्ष्यवेध करा त्वरित
खांद्यावर  यांचे बंदूक

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# अवयवदान सर्वश्रेष्ठ दान

अवयवदान हे एक महान दान आहे, ज्याद्वारे एखाद्या व्यक्तीचा जीव वाचू शकतो. मात्र, समाजामध्ये अवयव दानाविषयी अनेक गैरसमज आणि भीती आहेत, ज्यामुळे अवयव दानाचे प्रमाण खूप कमी आहे. यावर मात करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने 'अंगदान जीवन संजीवनी अभियान' ही विशेष मोहीम सुरू केली आहे. याविषयी आणि अवयव दानाचे महत्व विशद करणारा हा लेख




जगातील पहिले मानवी अवयव प्रत्यारोपण १९५४ मध्ये झाले, तर भारतात १९७१ मध्ये सीएमसी वेल्लोर येथे करण्यात आले. दुर्दैवाने ७५ वर्षांनंतरही भारतात अवयवदानाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. आज आपल्याकडे जे काही अवयव प्रत्यारोपण होत आहे, त्यात बहुसंख्य थेट संबंधित दात्यांकडून आहेत, तर ब्रेनडेड रुग्णांचे कॅडेव्हरिक अवयवदान नेहमीच मागे राहिले आहे. या उदात्त आणि मानवी कारणासाठी पाश्र्चिमात्य देशांच्या तुलनेत भारतात दहा हजारांपैकी केवळ एक रुग्ण अवयवदानासाठी संमती देतो, तर पाश्र्चिमात्य देशांत १० हजार लोकसंख्येपैकी सुमारे ३५०० लोकांमध्ये अवयवदानासाठी संमती मिळते.

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय अवयव आणि ऊतक प्रत्यारोपण संस्थेच्या (छ्जढ्ढज) आकडेवारीनुसार भारतात एकूण अवयव प्रत्यारोपणाची संख्या १८,९०० आहे. तसेच मृत दात्यांची संख्या १,१२८ तर जिवंत दात्यांची संख्या १५,००० आहे. मूत्रपिंड आणि यकृत प्रत्यारोपणासाठी प्रतीक्षा यादीतील रुग्णांची संख्या आणि भारतातील अवयवदान दर प्रति दशलक्ष लोकसंख्येमागे एक टक्क्यापेक्षा कमी असल्याची स्थिती आहे.

वर्ष २०२४ च्या अखेरपर्यंत भारतात शेवटच्या टप्प्यातील मूत्रपिंड आणि यकृताच्या आजारांच्या उपचारांसाठी २ लाख मूत्रपिंड आणि १ लाख यकृताची गरज आहे. मात्र दरवर्षी केवळ ४००० मूत्रपिंड प्रत्यारोपण आणि ५०० यकृत प्रत्यारोपण केले जात असून, हजारो रुग्ण नवीन आयुष्य जगण्याच्या संधीच्या प्रतीक्षेत अवयवांअभावी मृत्युमुखी पडत आहेत. हृदयाची परिस्थिती आणखी बिकट असून, पाच हजार रुग्णांना हृदयाची गरज असून केवळ २५३ हृदय प्रत्यारोपण केले जात आहे. तसेच २२० फुफ्फुसांचे प्रत्यारोपण करण्यात आले आहे.

सध्या भारतात सुमारे ५७० अवयव प्रत्यारोपण केंद्रे असून केवळ १४० नॉनट्रान्सप्लांट ऑर्गन रिट्रीव्हल सेंटर्स आहेत, जे लोकसंख्येच्या सध्याच्या गरजेनुसार खूपच कमी आहेत. दुसरे म्हणजे यातील बहुसंख्य खाजगी संस्था आहेत, जिथे उपचारांचा खर्च सर्वांना परवडणारा नाही. यावर उपाय म्हणून कमी खर्चाचे परवडणारे प्रत्यारोपण केंद्रांची संख्या वाढविणे आवश्यक आहे.

रस्ते अपघातात दरवर्षी सुमारे दीड लाख लोक मृत्युमुखी पडतात, त्यापैकी अनेक जण उपचारादरम्यान ब्रेनडेड होतात. एक ब्रेनडेड रुग्ण २ मूत्रपिंड, १ यकृत, १ हृदय, २ फुफ्फुस, १ स्वादुपिंड यांचा संभाव्य दाता असून एकाच वेळी ७ जीव वाचवू शकतो. तसेच कॉर्निया, त्वचा, हाडे यासारख्या ऊतींचे दान करू शकतो आणि अपंग रुग्णांना विविध अपंगत्वापासून मुक्त होण्यास मदत करू शकतो.

राज्यातील अवयवदानाचे प्रमाण वाढावे व अवयवदानाच्या प्रतीक्षेतील रुग्णांना नवजीवन मिळावे यासाठी दि. ३ ऑगस्ट १५ ऑगस्ट दरम्यान विविध उपक्रमांनी अवयवदान पंधरवडा साजरा होत आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्वत: पुढाकार घेत अर्ज भरून अवयवादानाची शपथ घेतली आणि या अभियानाचा शुभारंभ केला. राज्यातील जनतेने या अभियानामध्ये सहभागी होऊन अवयवदानाची शपथ घ्यावी, असे आवाहन आरोग्यमंत्री आबिटकर यांनी केले आहे.

अवयवदान ही एक सामाजिक बांधिलकी आहे. समाजामध्ये या विषयाबाबत सकारात्मक मतपरिवर्तन घडवण्यासाठी प्रभावी जनजागृती अत्यावश्यक आहे. मोहिमेतून अवयवदानासंबंधी भीती, गैरसमज व अंधश्रद्धा दूर करून वैज्ञानिक माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे महत्त्वाचे आहे. यासाठी 'अंगदान जीवनदान संजीवनी अभियान' दि. ३ ऑगस्ट ते १५ ऑगस्टदरम्यान राज्यात राबविण्यात येत आहे. या कालावधीत व्यापक जनजागृती व समाजाभिमूख उपक्रम राबविले जात असून यात शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, धार्मिक संस्था, आरोग्य संस्था व सामाजिक कार्यकर्ते आदींचा सक्रिय सहभाग आहे. यावर्षीच्या मोहिमेचे घोषवाक्य देहदान, महादान, दुसऱ्याला जीवनदान असे आहे.

या मोहिमेंतर्गत अवयवदानाच्या महत्त्वाविषयी जनजागृती करणे, अवयवदानाच्या गैरसमजांवर प्रकाश टाकणे, लोकांना अवयवदान करण्यास प्रोत्साहित करणे, अवयवदात्यांचा सन्मान करणे, गरजू रुग्णांना नवीन जीवनदान देण्यासाठी प्रेरित करण्यासाठी गावे, वाड्या, वस्त्या या ठिकाणी आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी, समुदाय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत घरोघरी जाऊन मोहिमेची माहिती देऊन अवयव दानाबाबत प्रोत्साहन दिले जाणार आहे.

अवयवदान म्हणजे काय ? :

अवयवदान म्हणजे अशी प्रक्रिया जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःचा अवयव काढून दुसऱ्या व्यक्तीला प्रत्यारोपित करण्यास कायदेशीररित्या परवानगी देते. एकतर दाता जिवंत असताना संमतीने, मृत्यूपूर्वी केलेल्या मृत देणगीसाठी कायदेशीर परवानगीद्वारे किंवा कायदेशीर जवळच्या नातेवाईकाच्या परवानगीद्वारे मृत देणगीसाठी परवानगी दिली जाते. देणगी संशोधनासाठी असू शकते किंवा सामान्यतः, निरोगी प्रत्यारोपण करण्यायोग्य अवयव आणि ऊती दुसऱ्या व्यक्तीमध्ये प्रत्यारोपित करण्यासाठी दान केली जाऊ शकतात.

प्रत्यारोपणामध्ये मूत्रपिंड, हृदय, यकृत, स्वादुपिंड, आतडे, फुफ्फुसे, हाडे, अस्थिमज्जा, त्वचा आणि कॉर्निया यांचा समावेश होतो. काही अवयव आणि ऊती जिवंत दात्यांद्वारे दान केल्या जाऊ शकतात, जसे की मूत्रपिंड किंवा यकृताचा काही भाग, स्वादुपिंडाचा काही भाग, फुफ्फुसांचा काही भाग किंवा आतड्यांचा काही भाग, परंतु बहुतेक देणग्या दात्याच्या मृत्यूनंतर होतात.

अवयवदान अनेक लोकांचे जीव वाचवू शकते. एका व्यक्तीच्या अवयवदानाने अनेक गरजू लोकांना नवीन जीवन मिळू शकते. अवयवदान करणे म्हणजे एक सामाजिक कार्य आहे. यामुळे समाजाला मदत होते आणि गरजू लोकांना आरोग्यदायी जीवन जगण्याची संधी मिळते. अवयवदानामुळे एखाद्या व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरात पुनर्जन्म मिळतो, असे मानले जाते. अवयव निकामी झालेल्या किंवा गंभीर वैद्यकीय परिस्थितीत असलेल्या लोकांना अवयवदानामुळे जीवनात दुसरी संधी मिळते.

अवयवदानाबद्दल गैरसमज : काही लोकांना अवयवदानाच्या बाबतीत धार्मिक गैरसमज आहेत. मात्र, अनेक धर्म अवयवदानाचे समर्थन करतात. काही लोकांना असा गैरसमज आहे की अवयवदानामुळे मृत्यूनंतर अंत्यसंस्कारांना उशीर होतो. मात्र, अवयवदान प्रक्रिया कमी वेळेत पूर्ण केली जाते. काही लोकांना वैद्यकीय गैरसमज आहेत की, अवयवदान केल्यास त्यांचे शरीर पूर्णपणे निकामी होईल. परंतु, अवयवदान करताना, डॉक्टरांकडून आवश्यक ती काळजी घेतली जाते.

अवयवदान कसे करावे : अवयवदान करण्यासाठी, तुम्ही राष्ट्रीय अवयव आणि ऊती प्रत्यारोपण संस्थेच्या (छ्जढ्ढज) (छ्रींळेपरश्र जीसरप ढ्ळीीेंश ढीरपीश्रिरपीं जीसरपळूरींळेप) संकेतस्थळावर किंवा इतर मान्यताप्राप्त अवयवदान संस्थांमध्ये नोंदणी करू शकता. अवयवदान करण्यापूर्वी, आपल्या कुटुंबातील सदस्यांशी याबद्दल चर्चा करणे महत्वाचे आहे. त्यांना आपल्या निर्णयाबद्दल माहिती देणे आणि त्यांची संमती घेणे आवश्यक आहे. अंगदान जीवनदान संजीवनी अभियान दि.३ ते १५ ऑगस्टपर्यंत चालणार असून, या कालावधीत सर्व आरोग्य संस्थेमध्ये, गाव, वाडी, वस्ती इत्यादी ठिकाणी आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी, समुदाय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत घरोघरी जाऊन मोहिमेची माहिती देऊन अवयव दानाबाबत प्रोत्साहन दिले जाणार आहे. या मोहिमेत जास्तीत जास्त नागरीकानी सहभागी होउन मोलाचे दान करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

सुनील देशपांडे यांची अवयवदान प्रतिज्ञा राज्य शासनाने अधिकृतपणे अवयवदान प्रतिज्ञा म्हणून घोषित केलेली आहे.

'अवयवदान प्रतिज्ञा'

'माणुसकी हा माझा मूळ धर्म आहे. पीडीतांच्या व गरजूंच्या जीवनात आनंद फुलवणे हीच माणुसकीची खरी शिकवण आहे, अशी माझी श्रद्धा आहे.

अवयवदानामुळे गरजू रुग्णांच्या जीवनात आनंद फुलविणे शक्य आहे तसेच मृत्यूपंथाला लागलेल्या व्यक्तीला नवा जन्म देता येतो. त्यामुळे हे सर्वात मोठे पुण्यकर्म आहे यावर माझा विश्र्वास आहे.

मी प्रतिज्ञा करीत आहे की, माझ्या शरीरात जे जे अवयव दुसऱ्या मानवाच्या जीवनात आनंद फुलवू शकतील अशा अवयवांवर माणुसकीचा पहिला हक्क व अधिकार असेल.

माझ्या अवयवांचा अशा माणुसकीच्या पुण्यकार्यासाठी उपयोग झाला पाहिजे, असा माझा आग्रह आहे.

माझ्या पुढील पिढ्यांनी या आग्रहाचा मान राखावा म्हणून मी त्यांना सतत स्मरण देत राहीन आणि पुढील पिढ्यांवर असेच संस्कार व्हावेत यासाठी मी प्रयत्नशील राहीन.'

महाराष्ट्र राज्यातील अवयवदानाशी संबंधित सर्व समस्या सोडविण्यासाठी आणि त्याचा अधिकाधिक प्रमाणात प्रसार करण्याच्या दृष्टिकोनातून 'अंगदान जीवन संजीवनी अभियान' नक्कीच मदतीचे ठरेल. यातून प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकाला अवयवदानाच्या कार्यपद्धतीची चांगली माहिती होईल आणि त्यांचे सर्व गैरसमज समाधानकारक आणि वैज्ञानिकदृष्ट्या दूर होतील, अशी अपेक्षा आहे.

**विजय राऊत (मो.न.९९७५४१२८२०)**
**सहायक संचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

## इतिहासात आजचा दिवस १० ऑगस्ट २०२५

अंतरराष्ट्रीय
१५१९ – फर्डिनांड मॅगेलन पाच जहाजे घेउन पृथ्वी–प्रदक्षिणेसाठी निघाला.
१६८० – न्यू मेक्सिकोत पेब्लो क्रांती सुरू.
१७९२ – फ्रेंच क्रांती – राजा लुई सोळाव्याला अटक.
१८०९ – इक्वेडोरची राजधानी क्विटोने स्पेनपासून स्वातंत्र्य जाहीर केले.
१८२१ – मिसुरी अमेरिकेचे २४वे राज्य झाले.
१८४६ – जेम्स स्मिथसनच्या ५,००,००० डॉलरच्या देणगीने स्मिथसॉनियन इंस्टीट्युटची स्थापना.
१९१३ – दुसरे बाल्कन युद्ध–बुखारेस्टचा तह – युद्धाचा अंत.
१९२० – पहिले महायुद्ध–सेव्हेसचा तह – दोस्त राष्ट्रांनी ऑट्टोमन साम्राज्य आपसांत वाटुन घेतले.
१९८८ – दुसऱ्या महायुद्धात बेकायदेशीरपणे बंदिवासात टाकलेल्या जपानी वंशाच्या अमेरिकन नागरिकांना अमेरिकेने प्रत्येकी २०,००० डॉलर देण्याचे कबूल केले.
१९९० – मॅगेलन अंतराळयान शुक्र ग्रहावर पोचले.
२००६ – युनायटेड किंग्डमची गुप्त पोलिस संस्था स्कॉटलंड यार्डने ईंग्लंडहून अमेरिकेला जाणारी विमाने नष्ट करण्याचा दहशतवाद्यांचा कट उधळुन लावला.
राष्ट्रीय
१७५८ – मराठी सैन्य अटकेपार पोहोचले.
१७६३ – माधवराव पेश्वयांच्या सैन्याने राक्षसभुवनच्या लढाईत निजामाचा पराभव केला.
१९४८ – भारतीय अणू उर्जा आयोगची स्थापना.
१९८६ – भारताचे माजी सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य यांची पुण्यात अतिरेक्यांकडून हत्या.
२००६ – सरकारी कर्मचाऱ्यांच्या सातत्यपूर्ण मागणीस अनुसरून पाचव्या वेतन आयोगाच्या अमलबजावणीस पंजाब सरकारने मंजूरी दिली.
२००७ – कुंबळेने फलंदाजीतले कौशल्य दाखवून इंग्लंड विरुद्ध खेळताना आपल्या कारकिर्दीतील पहिले कसोटी शतक ठोकले.
२००७ – अवघ्या ५० दिवसांची अक्षिता देशातील सर्वांत लहान पॅनकार्डधारक झाली.
२००८ – हैदराबादसह अन्य भागात मुसळधार पाऊस आणि पूराच्या विळख्यात सापडल्याने ५३ जणांचा मृत्यू झाला.
जन्म
१२६७ – जेम्स दुसरा, अरागॉनचा राजा.
१३९७ – आल्बर्ट दुसरा, पवित्र रोमन सम्राट.
१७५५ – नारायणराव पेश्वा.
१८६० – पंडित विष्णू नारायण भातखंडे, भारतीय संगीतकार, संगीततज्ञ.
१८५५ – कोल्यापुर दरबारचे प्रसिद्ध गायक अल्ला दियाँ खाँ.
१८७४ – हर्बर्ट हूवर, अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष.
१८९४ – भारताचे चौथे राष्ट्रपति वराहगिरी व्यंकटगिरी यांचा जन्म.
१८९५ – हॅमी लव्ह, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
१९२३ – फ्रेड रिजवे, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१९४३ – शफाकत राणा, पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू.
१९५८ – जॅक रिचर्ड, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१९७० – ब्रेंडन ज्युलियन, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
१९७८ – क्रिस रीड, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१९७९ – दिनुशा फर्नान्डो, श्रीलंकेचा क्रिकेट खेळाडू.
निधन
१७५९ – फर्डिनांड सहावा, स्पेनचा राजा.
१९४५ – रॉबर्ट गॉडार्ड, अग्निबाणाचे चनक..
१९७६ – बर्ट ओल्डफील्ड, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
१९८० – याह्या खान, पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष.
२००० – गिल्बर्ट पार्कहाउस, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
२००६ – अनिल कुमार मुझुमदार, माजी आय.ए.एस. अधिकारी.
प्रतिवार्षिक पालन
स्वातंत्र्य दिन – इक्वेडोर.

## रो. हेमंत रामढवे यांचा जालना येथे सन्मान

लातूर : रोटरी परिवाराचा सामाजिक कार्यात हिरीरीने सहभाग



राहत असतो, ही बाब सर्वज्ञात आहेच. जालना येथे नुकत्याच पार पडलेल्या रोटरी परिवाराच्या आनंद उत्सव सोहळ्यात लातूर रोटरी परिवारातील रो. हेमंत रामढवे यांचा सन २०२४ – २५ शाळांचा डिस्ट्रिक्ट ३१३२ मध्ये उत्कृष्ट असिस्टंट गव्हर्नर म्हणून सन्मान करण्यात आला.

रोटरीचे डीजे डॉ. सुरेश साबू यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन हेमंत रामढवे यांच्या कार्याचा, संघटन कौशल्याचा गौरव करण्यात आला. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना हेमंत रामढवे यांनी रोटरी परिवाराच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम राबविण्याकामी लातूरचा नेहमीच सिंहाचा वाटा राहिला आहे. समाजोपयोगी उपक्रमासोबतच गरजूंच्या मदतीसाठीही रोटरी परिवाराचे योगदान नेहमीच अतुलनीय असे राहत आले आहे व भविष्यातही रोटरी परिवार सतत विविध सामाजिक उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवेल ,असा विश्र्वास व्यक्त केला. यावेळी रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे, सचिव डॉ. नेताजी शिंगटे, हेमंत रामढवे, लक्ष्मीकांत गौड, गिरीश ब्याळे, मिलिंद आंबेकर, मेहुल कामदार, राजगोपाल मुंदडा, स्वामी, मुंडे , साहेबराव मोरे, गिरीश गारटे यांसह मान्यवरांची उपस्थिती होती. या सर्वांचा या आनंद उत्सवात उत्कृष्ट कार्याबद्द्ल सन्मान व गौरव करण्यात आला.

# 'स्मार्ट'द्वारे शेतकऱ्यांची आत्मनिर्भरता

लहान आणि सिमांत शेतकरी तसेच कृषी नवद्योजकांना केंद्रस्थानी ठेवून शेतमालाच्या सर्वसमावेशक आणि स्पर्धात्मक मूल्यसाखळ्यांच्या विकासासाठी मदत करण्याच्या उद्देशाने राज्यात जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाचा लाभ घेवून शेतीक्षेत्रात सकारात्मक बदल निर्माण करणारे चित्रही दिसून येत आहे. कांचनी कंपनी त्याचे एक प्रातिनिधीक उदाहरण होय. स्मार्ट योजनेंतर्गत राज्यात सुरू झालेल्या एकूण १४ जिनिंगपैकी कांचनी हा राज्यातील पहिला जिनिंग ठरला. शासकीय योजनेचा फायदा घेतांना शेतकऱ्यांनी एकत्र येवून शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन केली आणि थेट पिकांची मुल्यसाखळी निर्माण करून कच्च्या मालावरील प्रक्रीयेद्वारे मध्यस्थांकडे जाणारा पैसा स्वत:कडे वळविला. शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी घेतलेला पुढाकार व त्यातून ग्रामीण अर्थव्यस्थेला मिळालेली चालना आणि शेतकऱ्यांची आत्मनिर्भरता म्हणजे चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील कांचनी शेतकरी उत्पादक कंपनी.

या कंपनीने कापसावर प्रक्रिया करून थेट चीन, व्हिएतनाम आदी देशांमध्ये कापसाच्या गाठी निर्यात केल्या. या प्रकल्पास सहसंचालक कृषी नागपूर कार्यालयाद्वारे बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प योजनेंतर्गत ५ कोटी अर्थसहाय्य मंजूर झाले असून ३ कोटी वितरीत करण्यात आले. शेतकऱ्यांची एकजूट आणि शासनाची भरघोस साथ यामुळे कंपनीने वर्षाकाठी १०० कोटींची उलाढाल गाठली आहे. विभागातील तुमसर, कन्हानसह कामठी येथील अंतरंग या शेतकरी उत्पादक कंपन्यांनीही कांचनी कंपनीच्या पाऊलावर पाऊल ठेवत गतीने वाटचाल सुरू केली आहे.

अल्पभूधारक शेतकऱ्यांना वर्षभर मेहनत करून त्याच्या शेतमालास योग्य तो भाव मिळत नाही यावर उपाय म्हणून शेतकऱ्यांनी एकत्र येत रितसर नोंदणी करून २०१७ मध्ये कांचनी शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना केली. राज्य शासनाकडून स्मार्ट प्रकल्पांतर्गत मिळालेल्या ५ कोटींच्या अनुदानातून कॉटन जिनिंग ण्ड प्रेसिंग युनिट टाकण्यात आले. २४ डीआर जिनिंग व प्रेसिंग युनिट तसेच क्लिनिंग आणि रिडींग शेडची बांधणी करण्यात आली. याद्वारे शेतकऱ्यांना त्यांच्या कच्च्या कापसावर प्रक्रिया करून त्याच्या गाठी बनवून देण्यात आल्या व यातून त्यांना जास्त आर्थिक लाभ मिळाला. सुरूवातीला या कंपनीने सोयाबीन, हरभरा, तुर या पीकांची ट्रेडींग सुरू केली.

२०२३ मध्ये ३५० शेतकऱ्यांना ९०० कापसाच्या गाठी तयार करून देण्यात आल्या. वर्षाकाठी जवळपास ९५ हजार क्विंटल कापूस शेतकऱ्यांनी या जिनिंगला आणला व त्यापासून १८.५ हजार गाठी बनविल्या आहेत. आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये जवळपास १ लाख ८० हजार क्विंटल शेत माल सांघिक रित्या गोळा करून अंदाजे ८ हजार शेतकऱ्यांना या विक्री व्यवस्थेचा लाभ दिला आहे. हरभरा बिजोत्पादनाच्या माध्यमातून २५० शेतकऱ्यांना प्रति क्विंटल बाजारभावापेक्षा ११०० रूपये जास्त भाव दिला आहे, हे सर्व शेतकऱ्यांच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत समाधानकारक चित्र आहे.

शेतकरी हा व्यापारी व्हावा या उद्देशाने कांचनी कंपनीची वाटचाल सुरू आहे. या कपंनीमुळे आता शेतकऱ्यांना दलाली दयावी लागत नाही व त्यांच्या उत्पन्नातून पैसेही कपात होत नाही. सांघिक विक्री व्यवस्था निर्माण करून शेतकऱ्यांच्या उत्पादनाला बाजारपेठेत जास्तीत–जास्त दर मिळून देण्यात येतो. शेतकऱ्यांच्या सक्रीय सहभागातून त्यांना बाजारपेठेशी जोडले जात आहे. २ हजारपेक्षा जास्त शेतकरी सदस्य असणाऱ्या या कपंनीद्वारे शेतकऱ्यांना वेळेत शेतमालाचा मोबदला देण्यात येतो. चंद्रपूर, यवतमाळ व गडचिरोली जिल्ह्यातील ५२ शेतकरी कंपन्यांनी तूर, हरभरा, हळद, भात, सोयाबीन आणि कापसाच्या गाठी अन्य राज्यांमध्ये विक्री करून देण्यासाठी कांचनी कंपनी सोबत सामंज्यस करार केला आहे. कंपनी त्यांना चांगले खरीददार शोधून देते व त्याचा कसलाही मोबदला घेत नाही. वखार महामंडळातर्फे येथे तारण सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. शेतमालाच्या काढणी पश्र्चात व्यवस्थापन व प्राथमिक प्रक्रियेद्वारे मुल्यवृद्धी करण्यात येत आहे व ग्राहकांसाठी सुरक्षित खाद्य उत्पादित होत आहे.

कांचनी सोबतच नागपूर जिल्ह्यातील कामठी तालुक्यातील कन्हान येथे गट शेती आणि स्मार्ट प्रकल्पांतर्गत शेतकरी प्रगतीची कास धरत विकासाच्या मार्गावर अग्रणी झाले आहेत. २०१८ मध्ये २० शेतकऱ्यांनी एकत्र येत कन्हान ग्रोव्हिजन कंपनी स्थापन केली. यामाध्यमातून राईस मिल सुरू केला. शासनाच्या मदतीने प्रगती पथावर आरूढ झालेल्या या कंपनीला स्मार्ट प्रकल्पाने एक नवी दिशा दिली. २०२४ मध्ये या प्रकल्पांतर्गत ८७ लाखांचे अनुदान मिळाले यातून व्हिट क्लिनिंग ण्ड ग्रेडिंग मशीन, गोदाम, यंत्र बांधणीसाठी गव्हाचे शेड, ६० मेट्रिक टन क्षमतेचा धरमकाटा आदी साहित्य खरेदी केली. याद्वारे भोपाळ येथील आयटीसी कंपनीला मालाचा पुरवठाही होत आहे. ३१२ शेतकरी या प्रकल्पाशी जोडले असून गव्हाचे बिजोत्पादन घेण्याचा मानस त्यांनी बोलून दाखविला आहे. येत्या काळात हाच या कंपनीच्या यशाचा मार्ग शेतकऱ्यांनी ठरवला आहे.

नागपूर विभागात शेतकऱ्यांचे सीबीओ

राज्यात अल्प व अत्यल्प भूधारकांची संख्या अधिक असल्याने त्यांना संघटित करून शेतकऱ्यांचे गट व कंपन्या स्थापन करणे, गट शेतीवर भर देणे आणि त्या माध्यमातून शेतमालाचे एकत्रिकरण करून शेतकऱ्यांचा बाजार संपर्क वाढविण्यासाठी शासनामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येतात. स्पर्धात्मक शेतमाल मूल्य साखळ्यांच्या विकासाला मदत करण्याच्या उद्देशाने नागपूर विभागात स्मार्ट प्रकल्पातंर्गत कृषि विभागामार्फत शेतकऱ्यांच्या समुदाय आधारीत संस्था (कम्युनिटी बेस ऑर्गनायजेशन–सीबीओ), शेतकरी उत्पादक कंपन्या उभारण्यात येत आहेत. या शेतकरी संघांना नवीन संघटीत बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्यासाठी आवश्यक ते तांत्रिक सहाय्य, पायाभूत सुविधा आणि जोखीम निवारण क्षमता विकसित करण्यासाठी प्रकल्पामार्फत अनुदान देण्यात येत आहे.

नागपूर विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयामार्फत विभागातील ६ जिल्ह्यांमधील एकूण ७९ शेतकरी समुदाय आधारित संस्थांना (सीबीओ) मंजुरी देण्यात आली आहे. विभागात वर्धा जिल्ह्यात एकूण १० सीबीओंना मंजुरी देण्यात आली आहे. नागपूर जिल्ह्यातील १५, भंडारा जिल्ह्यातील ११, गोंदिया जिल्ह्यातील १४, चंद्रपूर जिल्ह्यातील २२ आणि गडचिरोली जिल्ह्यातील ७ सीबोओंचा यात समावेश आहे. या प्रकल्पांना स्मार्टअंतर्गत १७२.०५ कोटींची रक्कम मंजूर करण्यात आली तर १०३.०२ कोटींचे अनुदान वितरीत करण्यात आले.

यापूर्वी राज्यात जागतिक बँक (आयबीआरडी) सहाय्यीत, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या दोन प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी झाली. या धर्तीवरच जागतिक बँकेने राज्य शासनाला स्मार्ट प्रकल्पासाठी अर्थसहाय्य करण्याचा निर्णय घेतला आहे. स्मार्ट प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक गटांची निर्मिती व त्यांच्या सक्रिय सहभागाद्वारे शेतकऱ्यांना बाज़ारपेठशी जोडणे, शेतमालाचे काढणी पश्र्चात व्यवस्थापन व प्राथमिक प्रक्रियेद्वारे मुल्यवृद्धी करणे, ग्राहकांसाठी सुरक्षित खाद्य उत्पादित करण्यास मदत करणे आणि या सर्व उपक्रमांद्वारे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करून त्यांच्यासाठी उपजिविकेचे स्त्रोत निर्माण करण्यात येत आहे.

राज्याच्या कृषी व ग्रामीण उपजिविका क्षेत्रामध्ये स्मार्ट उपाययोजना राबवून राज्यात परिवर्तन घडविण्यासाठी जागतिक बँक व केंद्र शासनाच्या सहकार्यांने ही योजना राबविण्यात येत आहे. यामध्ये जागतिक बँकेकडून ७०%, राज्य शासनाचा हिस्सा २७% तर खाजगी उद्योगक्षेत्राच्या माध्यमातून (सीएसआर) ३% रक्कम पुरविली जात आहे. प्रकल्पाची एकूण किंमत २ हजार १०० कोटी रुपये एवढी आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी कृषी, पशूसंवर्धन, पणन, सहकार, महिला व बाल कल्याण, ग्राम विकास व नगर विकास या सात प्रशासकीय विभागांच्या अकरा यंत्रणा मिळून हा प्रकल्प राबवित आहेत. शेतकऱ्यांच्या जीवनात यामुळे सकारात्मक परिवर्तन घडून येत आहे.

**रितेश मो. भुयार**
**माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क, नागपूर**

## रोज खोटे बोलायचे अन् पळून जायचे, हे पळपुटे लोक.... फडणवीसांचे शरद पवारांना प्रत्युत्तर

मुंबई,: आजपर्यत राहुल गांधी यांनी अनेकदा ईव्हीएम मशीनबाबत शंका उपस्थित केली असली तरी शरद पवार तसे कधीच बोलले नव्हते. किंबहुना शरद पवार साहेबांनी अनेकदा स्पष्ट भूमिका घेतली होती की, ईव्हीएमला दोष देणे अयोग्य आहे. मात्र, आता राहुल गांधी यांच्या भेटीनंतर शरद पवार अचानक मतदानप्रक्रियेतील फेरफाराविषयी बोलू लागले आहेत. हा राहुल गांधी यांच्या भेटीचा परिणाम दिसतोय, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. ते शनिवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. शरद पवार यांनी आजच एका पत्रकार परिषदेत खळबळजनक गौप्यस्फोट केला होता. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीपूर्वी दिल्लीत दोन जण आपल्याला भेटायला आले होते. या दोघांनी आपल्याला १६० मतदारसंघांमध्ये हमखास विजय मिळवून देतो, असे सांगितले होते. मात्र, आम्ही पारदर्शकपणे निवडणूक प्रक्रियेला सामोरे जाण्याचा निर्णय घेतल्याचे शरद पवार यांनी सांगितले. त्यांच्या या वक्तव्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडाली होती. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना पवारांच्या सर्व आरोपांचे खंडन केले.

## साप्ताहिक राशिभविष्य
## दि. १० ऑगस्ट २०२५ ते १६ ऑगस्ट २०२५

..........................

**मेष** : आपण हाती घेतलेल्या प्रत्येक कामात आपणांस चांगले यश लाभेल. कुटुंबातीला वडिलधाऱ्या व्यक्तींकडून चांगला फायदा होईल, त्यांचा आधार मिळेल. महत्वाचे निर्णय घेताना सल्लाम सलत करुन निर्णय घ्यावेत. उद्योग व्यवसायात स्थिरता लाभेल. आपल्या मेहनतीला योग्य न्याय मिळेल. व्यवसाय उद्योगात उत्कर्ष साधता येईल. अचूक अंदाज व योग्य व्यक्तींकडून होणारी मदत यामुळे आपली निकड भागणार आहे. आपले कार्यक्षेत्र विस्तृत करण्याचा प्रयत्न कराल. नव्या आशा पल्लवीत होतील. आपल्या बुद्धीमत्तेच्या जोरावर मोठी मजल माराल. उद्योगात स्वत: जातीने लक्ष घालण्याची गरज आहे. उष्णतेचे विकार, डोकेदुखी, ॲसिडीटी यासांरखे त्रास होऊ शकतात. लेखक, साहित्यिकांच्या लिखाणाला पुरस्कार मिळण्याचे योग आहेत. कवि, कलाकार, गायक, चित्रकार यांना सतत प्रसिद्धीच्या झोतात राहण्याचे योग येतील. सामाजिक कार्यात विशेष रुची वाटेल.

**वृषभ** : संततीस काहीकारणांनी दुखापत संभवते. मनस्ताप होणाऱ्या घटना घडतील. खेळाडूंना मात्र खेळात प्राविण्य मिळण्याचे योग आहेत. सतत प्रसिद्धीच्या झोतात राहण्याचे योग येतील. चांगल्या संधींचा लाभ घेता येईल. राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांना अनेक कटकटींना सामोरे जावे लागेल. गर्भवती स्त्रियांनी मात्र आपल्या प्रकृतीची विशेष काळजी घेण्याची गरज आहे. नवीन नोकरीच्या संधी चालून येतील. वरिष्ठांची मर्जी संपादन कराल. आपल्या मनाजोग्या ठिकाणी बदली होईल. व्यवसाय उद्योगातील मोठया प्रमाणावरील आर्थिक उलाढाली टाळ्याव्यात. महत्त्वाचे निर्णय तूर्त टाळावेत. नोकरीत बदल करु इच्छिणाऱ्या तरुणांना यशोमार्ग लाभेल. यशस्वी होण्यासाठी इतरांवर अवलंबून राहू नका. स्वत:चे प्रयत्न स्वत:च करावेत. चैनीखातर खर्च कराल. सहलीचे बेत आखले जातील. कवि, कलाकारांना चांगल्या संधींचा लाभ होईल. जूने आजार डोके वर काढतील. उष्णतेचे विकार त्रास देतील. यंत्र, शस्त्र तसेच वाहनापासून धोका संभवतो. घरातील वडिलधाऱ्या व्यक्तींच्या प्रकृतीची काळजी वाटेल.

**मिथून**: धार्मिक स्थळांना भेटी देण्याचे योग येतील. हातून पुण्यकर्म घडेल. नवीन उपक्रमातून लाभ होतील. कामाच्या विस्ताराचा ध्यास घ्याल. प्रतिष्ठीत बड्या व्यक्तींचे सहकार्य लाभेल. प्रतिष्ठीत व्यक्तीच्या ओळखीतून कामे मार्गी लागतील. कोणताही निर्णय सारासार विचार करुनच घ्यावा. आपले तत्व सोडून कोणतेही काम करु नये. आपल्या बुद्धीमत्तेचा उपयोग चांगल्या कामासाठी करावा. कुटुंबात सुसंवाद साधण्याचा प्रयत्न करा. आईशी वादंग करुन नुकसान करुन घेऊ नका. राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींना चांगल्या संधींचा लाभ घेता येईल. गृहसुशोभिकरणासाठी महिला आकर्षक वस्तूंची खरेदी करतील. विवाहेच्छूक तरुणांना मनपसंत जोडीदार मिळेल. मित्रपरिवारात गैरसमज निर्माण होण्याची शक्यता आहे. आर्थिक व्यवहारात जामीन राहण्याचे टाळावे.

**कर्क** : कोणत्याही कामात भरघोस यश मिळेल. विद्यार्थ्यांना व तरुणांना चांगल्या संधी मिळतील. विवाहेच्छूक तरुणांना मनपसंत जोडीदार मिळेल. गाठीभेटी व परिचय होतील. अपेक्षित पत्रव्यवहार व फोन होतील. जबाबदारी वाढेल. आपले मनोबल वाढेल. सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घ्याल. प्रतिष्ठीत व्यक्तींचे सहकार्य लाभेल. अनपेक्षित खर्च उद्भवतील. आपल्या बुद्धीचा चांगला उपयोग करा. अविचाराने वागू नका. जवळच्या व्यक्तीला त्राल होईल असे वागू नका. लेखक, साहित्यिक यांच्या हातून दर्जेदार लिखाण होईल. गायन, वादन, चित्रकला यांमधे तरुणांना विशेष रुची वाटेल. कलांमधे उत्तम प्रविण्य मिळविता येईल. पूर्वी झालेली दिशाभूल निस्तरण्यात वेळ जाईल. महत्त्वाच्या निर्णयात वरिष्ठांचे मार्गदर्शन घ्यावे. यंत्र, शस्त्र, विजेची उपकरणे यांसंबंधीचे काम करत असलेल्या तरुणांनी सावधगिरी बाळगण्याची गरज आहे. प्रकृती अस्वास्थ जाणवेल. आपण हाती घेतलेल्या कामात यश मिळण्यासाठी आपल्याला थोडे थांबावे लागणार आहे.

**सिंह** : रेंगाळलेली शासकीय कामे मार्गी लागणार आहेत. नोकरीत वरिष्ठांची मर्जी संपादन कराल. आपली काम करण्याची इच्छा तीव्र असेल तर असामान्य शक्तीची साथ आपणास मिळणार आहे. तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी लाभतील. कला, साहित्य क्षेत्रातील लोकांना नवीन संधी उपलब्ध होतील. राजकीय क्षेत्रातील तरुण मंडळींना चांगल्या संधी, नवीन जबाबदाऱ्या मिळतील. प्रसिद्धीच्या झोतात राहता येईल. भावंडांसंबंधी काही समस्या निर्माण होऊ शकतात. कामानिमित्त घडणाऱ्या प्रवासात अडचणी येण्याची शक्यता राहते. तसेच पूर्वनियोजित कार्यक्रमात बदल करावे लागतील. अनावश्यक प्रवास टाळण्याचा प्रयत्न करावा. प्रॉपर्टीच्या व्यवहारातून चांगली आर्थिक प्राप्ती होईल. तसेच नवीन वास्तूचे योग येतील. घरात मंगलकार्याची नांदी होईल. आपल्या आवडत्या छंदातून चांगली अर्थप्राप्ती होईल. आर्थिक सुबत्ता वाढेल. महिलांनी आर्थिक बाबतीत तसेच विवाहकार्यात मध्यस्ती करु नये. मोठया यशासाठी प्रयत्न करावे लागतील. मार्गदर्शन घडेल.

**कन्या** : कोणत्याही महत्वाच्या आर्थिक व्यवहारात अडचणी निर्माण होण्याची शक्यता राहते. वाहनाच्या त्रासाला सामोरे जावे लागेल. घरातील व्यक्तींच्या मतांना दुजोरा दिलात तर आपला फायदा होईल. भावाबहिणींशी वागताना भावनिक उद्रेक होणार नाही याची दक्षता घ्या. घरात भावंडांमधे सुसंवाद साधण्याचा प्रयत्न करा. मानसिक ताणतणाव जाणविण्याची शक्यता राहते. पूर्वनियोजित प्रवासात काही कारणाने विलंब होण्याची शक्यता आहे. सामाजिक कार्यातून मनस्ताप होण्याची शक्यता राहते. विवाहेच्छूक तरुणांचे विवाह ठरतील. परंतू विवाह ठरविताना पूर्ण चौकशीअंती निर्णय घ्यावेत. नोकरीत बढती–बदलीचे योग येतील. वरिष्ठ पदावर काही काळ काम करण्याची संधी मिळेल. मनाजोग्या ठिकाणी बदली होईल. नवीन व्यावसायिक करार घडतील. प्रगतीपथावर मार्गक्रमण करण्यासाठी सतत नवीन योजनांची आखणी कराल. आपण हाती घेतलेले प्रत्येक काम यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी सहाय्यकांची मदत मोलाची ठरणार आहे. व्यवसाय उद्योगातून आपली आवक वाढणार आहे. केमिकल्स, फर्निचर तसेच चैनीच्या वस्तूंचे व्यापारी यांना चांगला फायदा होईल. कवि, कलाकारांना सुसंधी लाभतील.

**तूळ** : वैयक्तीक बाबतीत काही मनस्ताप वाढविणाऱ्या घटना घडतील. महत्वाचे निर्णय शांत विचारपूर्वक घरातील मोठ्या व्यक्तिच्या सल्याने घेणे आवश्यक आहे. मन सैरभैर होईल. आपल्या इच्छा, अपेक्षा स्वत:च्या काबूत ठेवाव्यात. हितशत्रूंच्या कारवायांवर मोठया युक्तीवादाने मात कराल. हाती घेतलेल्या कामात विलंब होण्याची शक्यता आहे. नोकरीत काही गोष्टी मनप्रमाणे न घडल्यामुळे मन सैरभैर होईल. कामाचा ताण जाणवेल. एखाद्या गोष्टीबद्दल जास्त वेळ विचार करायची सवय लागल्यामुळे निर्णय घेण्यास विलंब लागेल. अनावश्यक खर्च उद्भवतील. आपल्या कामाच्या पूर्ततेसाठी दुसऱ्यांवर अवलंबून राहू नका. विद्यार्थी वर्गाला शैक्षणिक क्षेत्रात चांगली प्रगती साधता येईल. उच्चशिक्षणासाठी प्रवेश मिळेल. अपघातजन्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. अनावश्यक प्रवास टाळावेत. खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करावा. काही गोष्टी आपल्या मनाप्रमाणे घडणार नाहीत त्यामुळे आपली चिडचिड होणार आहे. आत्मोन्नतीचा फायदा होईल. आपल्या आवडत्या छंदातून अर्थप्राप्ती होईल. नवनिर्मितीचा आनंद घ्याल.

**वृश्चिक** : आपल्याला आलेल्या अडचणींना मार्ग शोधण्यासाठी योग्य व्यक्तीचे मार्गदर्शन लाभेल. महत्त्वाच्या कामांची अंमलबजावणी योग्य व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली करावी. प्रकृती अस्वास्थ जाणवेल. घरातील वडिलधाऱ्या व्यक्तीच्या प्रकृतीची काळजी वाटेल. वाहन चालविताना वाहनाच्या वेगावर नियंत्रण ठेवावे. नैसर्गिक आपत्तीपासून त्रास होऊ शकतो. आव्हानात्मक कामे स्वीकारताना दहा वेळा विचार करावा. व्यवसाय उद्योगातील महत्त्वाचे अनुत्तरीत प्रश्न सुटतील. जाणीवपूर्वक आपल्या विचारसरणीत केलेल्या अनुकूल बदलामुळे फायदा होईल. आपली शासकीय कामे पुढे ढकलावीत. राजकीय, सामाजिक क्षेत्रात मोठे निर्णय घेताना तज्ज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन घ्यावे. घरातील वातावरण आनंदी राहील. विवाहेच्छूक तरुणांचे विवाह ठरतील. अनपेक्षित धनलाभाची शक्यता आहे. जूनी येणी वसूल होतील. सासुरवाडीकडून आर्थिक सहकार्य लाभेल. महिलांच्या हाती पैसा खेळेल. मात्र कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नका. कुसंगतिपासून दूर राहा. व्यसनांच्या आहारी जाऊ नका.

**धनू** : यंत्र, शस्त्राशी सतत कामकरणाऱ्या व्यक्तींनी दक्षता बाळगावी. खेळाडूंना दुखापत होण्याचा संभव आहे. कुसंगतिपासून दूर राहा. अनोळखी व्यक्तीकडून नुकसान होण्याची शक्यता आहे. शेअर्समधे गुंतवणूक टाळावी. स्वत:ची मत, अपेक्षा, इच्छा काबूत ठेवून मगच महत्वाचे निर्णय घ्यावेत.अनावश्यक प्रवास टाळावेत. घरातील वयस्कर व्यक्तींच्या प्रकृतीची चिंता जाणवेल. स्वतंत्र विचारांची आवश्यकता आहे. दुसऱ्याबद्दलचे मत व्यक्त करताना त्यांची बाजू ऐकून घ्या. सामाजिक, राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना त्रासदायक परिस्थितीला सामोरे जावे लागेल. हाताखालच्या व्यक्तींना चुचकारुन त्यांच्याकडून काम करुन घ्यावे लागेल. नोकरीतून मनाविरुद्ध बदली झाल्यामुळे कामातून मन विचलित होईल. सहकारी वर्गाचे सहाय्य लाभणार नाही. मित्रपरिवारात गैरसमज निर्माण होतील. विवाहेच्छूक तरुणांचे विवाह ठरतील. भागीदारी व्यवसायातून फायदा होईल. कामाच्या विस्ताराचा ध्यास घ्याल. महत्त्वाचे व्यावसायिक करार रेंगाळतील. आर्थिक जामीन राहू नका, नाहीतर मनस्ताप होईल. सार्वजनिक संबंधाच्या प्रश्नांशी सतत संबंध येतील. त्यातूनच समाजात नांवलौकिक वाढेल.

**मकर** : राहत्या जागेचे किंवा व्यवसायाच्या जागेचे प्रश्न सुटतील.महिला स्वत:च्या पद्धतीने गृह सजावट करतील.महिलांना बदलाची नितांत गरज भासेल. उपासना मार्गातील लोकांना चांगली अनुभूती मिळेल. आपल्याला चांगला मार्गदर्शक भेटेल. नवनवीन कल्पना आकार घेतील. व्यवसाय उद्योगात नवनवीन प्रकल्प हाती घेऊन यशस्वीपणे पूर्ण कराल. शैक्षणिक क्षेत्रात परदेशातील संस्थांशी संबंध येतील. आपली आर्थिक बाजू बळकट करणाऱ्या घटना घडतील. जुनी थकेलेली येणी वसूल होतील. आरोग्याच्या जुन्या तक्रारी डोकेवर काढतील. नेत्रविकार, उष्णतेचे विकार यांच्यापासून त्रास होण्याची शक्यता आहे. विरोधकांच्या कारवायांवर मात कराल.

**कुंभ** : प्रकृतीच्या तक्रारी हळूहळू कमी होऊ लागतील. पूर्वनियोजित प्रवासात बदल करावे लागतील. मोठया व्यक्तींच्या मदतीने उद्योग, नोकरीत उत्कर्ष करणाऱ्या घटना घडतील. कार्यकौशल्याची प्रशंसा होईल. आप्तांसाठी खर्च करावा लागेल. सामाजिक कार्यात सहभागी होण्याची संधी लाभेल. घरातील दुर्लक्षित कामांना वेळ देता येईल. घरातील सुखसुविधा वाढविण्याकरीता नवीन खरेदीचे मनसुबे आखाल. एखाद्या कौटुंबिक समस्येवर आपण तोडगा काढाल. आपल्या प्रयत्नांना योग्य न्याय मिळेल. विश्वासाच्या जोरावर आपले ध्येय गाठाल. जमिनीच्या व्यवहारात यश मिळेल, आर्थिक किंवा व्यावसायिक योजना अमलात आणाल. जगाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलावा लागेल. दुसऱ्यांकडून काम करुन घेण्यात यशस्वी व्हाल. शैक्षणिक यश लाभेल. नवपरिणितांना गोड बातमीची चाहूल लागेल. कलाकारांना सतत प्रसिद्धीच्या झोतात राहण्याचे योग येतील. तसेच कलेतून आवक वाढेल. नवीन कल्पना आकार घेतील. महत्वाच्या कामात यश लाभणे कठीण आहे.

**मीन** : दीर्घमुदतीच्या आजारांपासून त्रास होईल. कुटुंबातील वडीलधाऱ्या व्यक्तींच्या प्रकृतीची काळजी वाटेल. वाहन चालविताना वाहनाच्या वेगावर नियंत्रण ठेवावे. भाजणे, कापणे, धडपडणे यांतून दुखापत होऊ शकते. अवाजवी साहस टाळावे. यंत्र, शस्त्राशी कार्यरत असलेल्या व्यक्तींनी विशेष दक्षता घ्यावी. खोट्या गोष्टी कळल्यामुळे रागाचा पारा उंचावेल. मात्र अविचाराने कोणतेही निर्णय घेऊ नका. कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नका. उधारी उसनवारी वसुल होईल. नवीन आर्थिक गुंतवणूक करताना विचारपूर्वक करावी. घरात मौल्यवान वस्तूंची खरेदी केली जाईल. गृहउद्योगातून, जोडधंद्यातून चांगला फायदा होईल. मनस्वास्थ मिळेल. उद्योग व्यापारात चांगली उलाढाल होईल. व्यावहारिक स्पर्धेत आपण आग्रेसर राहणार आहात. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखून काम केलेत तर निश्चीत एखाद्या सवलतीचा लाभ घेता येईल. राजकीय, सामाजिक क्षेत्रातून आपली सामाजिक पत उंचावेल. शैक्षणिक कार्यात असलेल्या व्यक्तींना मानसन्मान लाभेल.

## अपूर्ण नव्हे, तर स्वयंभूछ मन में है विश्वास, हम होंगे कामयाब! -संप्रदा बीडकर

त्यांचे जगच वेगळेष्ठ शब्दांच्या पलिकडचे, केवळ सांकेतिक खुणांचे आणि नजरेतील भावांचे. ही भाषा कदाचित आपल्याला सहज कळणार नाही, पण त्यांच्या डोळ्यांतील चमक बघाष्ठ त्यात भविष्याबद्दलचा अढळ विश्वास दिसतो. जणू काही ते साऱ्या जगाला न बोलता सांगत आहेत, ''आम्ही अपूर्ण नाही, आम्ही स्वयंभू आहोत! तुम्ही फक्त आमच्या पाठीवर विश्वासाचा हात ठेवा आणि लढ म्हणा, मग बघा, आम्ही हे जग मुठीत कसे आणतो!''

हाच नि:शब्द, तरीही अत्यंत प्रभावी संवाद मिरजच्या कै. रा. वि. भिडे मूक–बधिर शाळेच्या चार भिंतीत घुमत होता. निमित्त होते एका ऐतिहासिक बदलाचे. ज्या मुलांना आपण समाजाच्या स्पर्धेत कुठेतरी मागे राहतील असे समजतो, त्याच मुलांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्सच्या विश्वाचे दरवाजे उघडले जात होते. हे स्वप्नवत वाटणारं कार्य सत्यात उतरवलं सांगलीचे जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी. ''आमची सांगली – सक्षम दिव्यांग आमचा अभिमान'' हे केवळ ब्रीदवाक्य न ठेवता, त्यांनी ते कृतीत आणले. त्यांच्या संकल्पनेला पुण्याच्या 'वरशिप अर्थ फाऊंडेशन'ने दिलेला प्रतिसाद म्हणजे या मुलांच्या नशिबात उगवलेली एक सोनेरी पहाट होती.

गेले १५ दिवस, रोज तीन तास, या शाळेतील वर्ग जिवंत झाले होते. इथल्या ७३ मुला–मुलींच्या हातांना जणू भविष्याला आकार देणारे पंखच फुटले होते. जेव्हा त्यांनी थ्री–डी प्रिंटरमधून गणपती बाप्पाची मूर्ती साकारली, तेव्हा तो केवळ एक प्रयोग नव्हता, तर त्यांच्या सुप्त सर्जनशीलतेला मिळालेला तो पहिला हुंकार होता. – जेव्हा त्यांनी सेन्सॉरच्या मदतीने आग लागल्यास किंवा लाईट गेल्यास वाजणारा अलार्म बनवला, तेव्हा ते केवळ विज्ञान शिकत नव्हते, तर तंत्रज्ञान आपले मित्र आणि रक्षक कसे बनू शकते, याचा अनुभव घेत होते.

जेव्हा त्यांनी चॅट–जीपीटीमध्ये स्वत: टाईप करून आपल्या मनातल्या कल्पनांना चित्रांचे रूप दिले, तेव्हा त्यांच्या भावनांना व्यक्त होण्यासाठी शब्दांची गरज उरली नाही. तंत्रज्ञानाने त्यांना नवी 'भाषा' दिली, नवा 'आवाज' दिला! ज्या मुलांना आजवर फक्त सहानुभूती मिळाली, त्यांना या कार्यशाळेने आत्मविश्वासाची आणि समान संधीची ताकद दिली. एऊएॼ (सायन्स, टेक्नॉलॉजी, इंजिनिअरिंग, मॅथेमॅटिक्स) सारख्या क्लिष्ट वाटणाऱ्या क्षेत्रांची दारे त्यांच्यासाठी उघडली गेली. ही फक्त एक कार्यशाळा नव्हती; हा एका मोठ्या बदलाचा पाया आहे. ज्यांना ऐकू–बोलता येत नाही, त्यांच्यासाठी व्यक्त होण्याचा, शिकण्याचा आणि या डिजिटल जगात अभिमानाने वावरण्याचा हा एक नवा महामार्ग आहे. या ज्ञानाच्या आणि आत्मविश्वासाच्या बळावर, ही मुले उद्या केवळ स्वावलंबी होणार नाहीत, तर इतरांसाठी प्रेरणास्रोत बनतील. कारण ते अपूर्ण नाहीत, ते स्वयंभू आहेत. आणि त्यांचा हा प्रवास आता खऱ्या अर्थाने सुरू झाला आहे!

## विधानसभेच्या निवडणुकीआधी घडली धक्कादायक घटना, शरद पवारांनी केला मोठा दावा

मुंबई,: दिल्लीत असताना दोन जण विधानसभा निवडणुकीची ऑफर घेऊन मला भेटले. त्यांनी १६० जागा जिंकवून देण्याची हमी दिली. या दोन जणांना मी राहुल गांधींना भेटवून दिले होते. पण आता त्या दोघांचे नाव – पत्ते आणि संपर्क क्रमांक यापैकी काहीही माझ्याकडे नाही, असा धक्कादायक दावा शरद पवार यांनी केला आहे. एक पत्रकार परिषद घेऊन शरद पवारांनी हा दावा केला. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीआधी दिल्लीत दोनजण भेटले. त्यांनी राज्यात २८८ पैकी १६० जागांवर जिंकवून देण्याची हमी दिली होती. त्यावेळी मी त्यांची गाठ राहुल गांधी यांच्याशी घालून दिली. त्या लोकांना जे जे काही बोलायचं होतं, ते राहुल गांधी यांच्या समोर म्हटलं.आपण या प्रकारात पडू नये, असे आम्ही ठरवले. हा आपला रस्ता नाही, लोकांचा निर्णय असेल तो आपण स्वीकारू असा आम्ही विचार केल्याचे शरद पवार म्हणाले.

## वाळू माफियांविरोधात महसूल मंत्री क्शन मोडवर !

बुलढाणा, (जिमाका) : जिल्ह्यातील वाळू माफियांविरोधात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे क्शन मोडवर आले आहेत. जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर एमपीडीए अर्थात महाराष्ट्र धोकादायक व्यक्ती प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करा, असे स्पष्ट निर्देश त्यांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना शनिवारी महसूल विभागाच्या आढावा बैठकीत दिले.




महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी, भूमि अभिलेख विभागाचा आढावा घेण्यासाठी महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे काल जिल्हा दौऱ्यावर आले होते. त्यानुषंगाने त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात महसूल व इतर विभागाचा आढावा घेतला. त्यावेळी मंत्री बावनकुळे यांनी निर्देश दिले. या बैठकीला कामगार मंत्री ड. आकाश फुंडकर, आमदार श्वेता महाले, आमदार संजय गायकवाड, आमदार मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, उपवनसंरक्षक सरोज गवस, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार उपस्थित होते.

याबैठकीत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणारे आणि त्यात सामील असणाऱ्या महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निगराणी ठेवून दोषींवर कारवाई करावी. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्यावर कारवाई करतांना मंत्री, खासदार, आमदारांच्या सूचना आल्यास त्यानुसार कार्यवाही करु नका आणि वाळू माफियांना सोडू नका, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. जिल्ह्यात यापुढे अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीला जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांवर जबाबदारी निश्र्चित केली जाईल,असा इशाराही महसूल मंत्र्यांनी यावेळी दिला.

याशिवाय, जिल्ह्यातील वाळू साठे आणि वाळू घाटांचे पुन्हा सर्व्हेक्षण करावे. त्यासाठी उपविभागीय अधिकारी, तहसीलदारांनी पाहणी करावी व एमआरसॅक यंत्रणेचा वापर करावा. तसेच नवीन वाळू धोरणानुसार कार्यवाही करावी. यासह, कृत्रिम वाळू धोरणांतर्गत वाळूचा उच्च दर्जा असावा याची खबरदारी घ्यावी. घरकुलांसाठी गरीब, सर्वसामान्यांना वाळू उपलब्ध करुन द्यावी. अवैध वाळू वाहतुकदारांकडील प्रलंबित दंड वसूल करावे. गायरान जमिनीवरील घरांची प्रकरणे निकाली काढा, त्यासाठी व्यापक मोहीम राबवावी. गैरकायदेशीररित्या शासकीय जमिनी बळकावणाऱ्या धनदांडग्यांवर कारवाई करावी. पाणंद व शिवररस्ते मोकळे करावे. त्यानुषंगाने गावनिहाय नकाशे तयार करुन दर्शनी भागात लावावे. नागरिकांच्या तक्रारी व प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी लोक अदालतीचे आयोजन करावे. विशेष सहाय योजना आणि ग्रीस्टॅक अंतर्गत नोंदणीसाठी गावपातळीवर मोहीम राबवा. यासाठी प्रशासनाने शेतकऱ्यांच्या घरोघरी भेटी द्याव्यात. पोटखराब, कजाप, सातबारा दुरुस्तीची कामे लवकरात लवकर पूर्ण करावी. शासनाच्या धोरणानुसार डिसेंबर महिन्यापर्यंत भोगवटादार वर्ग २ च्या जमिनी भोगवटादार वर्ग १ मध्ये रुपांतरित कराव्यात. याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे शेतकऱ्यांना आवाहन करावे.

ई–चावडी, जिवंत सातबारा मोहिमेचे कौतूक

जिल्हा महसूल प्रशासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या ई–चावडी, जिवंत सातबारा मोहिमेची अंमलबजावणी समाधानकारक असून या मोहिमेचा टप्पा दोन लवकर पूर्ण करा, असे निर्देश देवून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोहिमेचे कौतूक केले.

या बैठकीत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल विभागाशी संबंधित विविध विषयांचा आढावा घेतला. जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात वैज्ञानिक रांगोळी स्पर्धा

लातूर : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयात प्राणिशास्त्र व मत्स्यशास्त्र विभागातर्फे दि.०६ ऑगस्ट २०२५ रोजी जैवविविधता व तिचे संरक्षण या विषयावर वैज्ञानिक रांगोळी स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेत बी.एस्सी.पदवी व एम.एस्सी.पदव्युत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला.



सदरील स्पर्धेत वैभवी कुलकर्णी व शेख सानिया या विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक मिळविला, तर सुमैया शेख व भिसे संजना या विद्यार्थिनींनी द्वितीय क्रमांक मिळविला.भुरे ऋतुजा या विद्यार्थिनीने तृतीय क्रमांक मिळविला. सदरील वैज्ञानिक रांगोळी स्पर्धा घेण्यासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे व विभाग प्रमुख डॉ.आर.व्ही.सोळुंके यांचेही मार्गदर्शन लाभले.या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा.शितल पाटील व प्रा.अश्र्विनी कांबळे यांनी काम पाहिले.यावेळी डॉ. रत्ना कीर्तने,डॉ.सुरज कोल्हे,डॉ.अमोल ठोसर,प्रा.शिलेश गावित,प्रा.प्रतिका धरणे,प्रा.आगलावे मनाली,बालाजी चित्ते,गोविंद सांगवे,नाना काळुंखे,सुजित अपसिंगेकर यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## (गुरु वचन)
## कर्मयोगासाठी कौशल्य असणे आवश्यक

माणसाला त्याने केलेल्या कर्मानुसार फळ मिळत असते. परंतु बऱ्याजणांची तक्रार असते की, आपण दिवसभर राबूनही कसेबसे पोटापुरते मिळते, तर तेच काम करणारा आपला शेजारी मात्र सुखात असतो. तसेच तो काम केल्यानंतर समाधानीही दिसतो. गीतेत भगवंतानेही म्हटले आहे की कर्मयोग याचा अर्थ कौशल्याने वा शास्त्रीय पध्दतीने काम करणे. कर्मानुष्टानाचा विधी व्यवस्थित समजून घेतल्यासच माणसाला उत्तम फळ मिळू शकते. सर्व कर्मांचा उद्देश मनामध्ये पूर्वीपासून असलेली शक्ती प्रकट करणे व आत्मा जागृती करणे, प्रत्येक माणसामध्ये पूर्ण ज्ञान व पूर्ण शक्ती असते. निरनिराळी कर्मे या महान शक्ती जागृत करण्याचे व प्रकट करण्याचे फक्त साधन आहे. या साधनाचा आपण किती कौशल्याने वापर करतो यावर त्याचे फळ अवलंबून असते.

## उपदेशकथा
## महापुरे झाडे जाती..

एका घनदाट जंगलात खळखळ वाहणाऱ्या नदीच्या किनाऱ्यावर एक विशाल वटवृक्ष होता व दुसऱ्या किनाऱ्यावर एक वेळूचे झाड होते. ते अगदीच पातळ व लवचिक होते. वटवृक्षाच्या आपल्या विशालतेचा गर्व होता. तो वेळूच्या झाडाला म्हणाला, तुझे जीवन निरर्थक आहे. तुझ्या पातळपणामुळे तू कोणालाही सावली देऊ शकत नाहीत. फळे, फुले नसल्याने पशुपक्षीही तुझ्याजवळ येत नाहीत. याउलट माझी सावली, फळे, फुले यांचा सर्वांना उपयोग होतो. वेताच्या झाडाने जाणले की, वटवृक्षाला त्याच्या विशालतेचा गर्व झाला आहे पण तो गप्प बसला. काही दिवसांनी वादळ आले. घनघोर पाऊस पडू लागला. वादळाच्या वेगाने व पाण्याच्या रेट्याने वडाचे झाड उन्मळून पडले पण वेताचे झाड पाण्याच्या व वादळाच्या वेगाच्या दिशेने वाकल्यामळे जसेच्या तसे राहिले. वादळ शांत झाले. पाणी वाहून गेले पण वेताचे झाड पूर्वीप्रमाणेच उभे होते व वटवृक्षाचे नामोनिशाणही नव्हते.

कथा उपदेश : विनयाचा अंतिम विजय होतो. गर्वाचे घर खाली होते.

## प्रशासकीय अधिकारी आणि पत्नींच्या संस्थेमार्फत शिलाई मशीन्सचे वितरण

मुंबई, – प्रशासकीय अधिकारी व त्यांच्या पत्नींची संघटना आयएएसओडब्ल्यूए (IASOWA) ही अखिल भारतीय स्तरावर कार्यरत असलेली ना नफा तत्वावर सामाजिक कार्यासाठी कटिबद्ध असलेली संस्था आहे.



या संस्थेच्या महाराष्ट्र शाखेमार्फत शोभा अरुण नाईक आणि यास्मिन फिरोज मोमिन या स्वयंसाहाय्य गटातील दोन विधवा महिलांना शिलाई आणि कटर मशीनचे वितरण करण्यात आले. आयडीबीआयच्या सौजन्याने सीएसआरच्या माध्यमातून या मशीन्स देण्यात आल्या आहेत.

शुक्रवारी मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात या मशीन्सचे वितरण करण्यात आले. यावेळी संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती अर्चना मीना, सचिव श्रीमती आर.विमला, खजिनदार झेबा नाईक, सुप्रिया छडगल यांच्यासह संस्थेच्या पदाधिकारी आणि सदस्य तसेच आयडीबीआयचे पदाधिकारी उपस्थित होते.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894